





# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १०५ * नांदेड * मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## इराणमध्ये सत्तापालट! इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने घेतला देशाचा ताबा

**तेहरान (वृत्तसंस्था)–** अमेरिकेने केलेली युद्धबंदी बुधवारी संपत असताना आणि पाकिस्तानात चर्चेच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात होत असताना न्यूयॉर्क पोस्ट आणि अमेरिकन थिंक टँक इन्स्टिट्यूट फॉर द स्टडी ऑफ वॉरच्या अहवालानुसार इराणमध्ये 'इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स' राजसत्तेवर पूर्णपणे कब्जा मिळविला आहे. आयआरजीसीचे मेजर जनरल अहमद वाहिदी हे इराणचे सर्वात शक्तिशाली नेते बनले आहेत. यामुळे जगावर महायुद्धाचे संकट घोंघावू लागले आहे.

गेल्या दीड महिन्यांपासून अमेरिकेला तोडीस तोड उत्तर देत असलेल्या इराणमध्ये मोठ्या घडामोडी सुरु आहेत. पडद्याआड सुरु असलेला संघर्ष आता उघडपणे समोर आला असून इराणमधील घडामोड जगाची चिंता वाढवणारी आहे. अमेरिका आणि इराण या दोघांमधील युद्ध संपण्याची काही चिन्हे दिसत नसून हॉर्मुझच्या सामुद्रधुनीबाबत आक्रमक भूमिका घेतली असून इराणमधून सत्तापालटची बातमी समोर आली आहे.

अमेरिकेसोबतच्या शांतता चर्चेबद्दल निर्णय घेण्याचे अधिकारही वाहिदी आणि त्यांच्या निकटवर्तीयांच्या हातात गेले आहेत. या सगळ्याला इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनी यांची मूकसंमती असल्याचे समजते. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची हे हॉर्मुझचा समुद्री मार्ग उघडण्यास अनुकूल होते. मात्र, आयआरजीसीने हा निर्णय धुडकावून लावत उलट आपल्या 'फास्ट अटॅक शिप्स'च्या माध्यमातून हा मार्ग पूर्णपणे ब्लॉक केला आहे. गेल्या ४८ तासांत तीन जहाजांना लक्ष्य करण्यात आलं आहे. यातील दोन जहाजं भारतीय आहेत.

आत्ताच्या घडीला शेकडो जहाजे पर्शियन आखातात अडकून पडली आहे. विशेष म्हणजे इराणच्या शिष्टमंडळाचा भाग असलेले कट्टरतावादी नेते मोहम्मद बागेर जोलगाद्र यांनी परराष्ट्र मंत्री अरागची यांची तक्रार केली. अमेरिकेसोबत चर्चा करतेवेळी अरागची यांनी मवाळ पवित्रा घेतल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले. त्याचाच परिणाम म्हणून संपूर्ण शिष्टमंडळाला तेहरानला परत बोलावण्यात आले. आता इराणमध्ये मवाळ पवित्रा घेणाऱ्यांचा आवाज दाबण्यात आला आहे.

शस्त्रसंधी संपण्याची वेळ जवळ येत आहे आणि इराणने चर्चेची पुढची फेरी फेटाळून लावली आहे. अमेरिकेच्या मागण्या अवास्तव असल्याचा ठपका आयआरजीसीने ठेवला आहे. वॉशिंग्टनच्या तज्ज्ञांनुसार, इराणमधील या अंतर्गत सत्तापालटानंतर आता अर्थपूर्ण चर्चेची शक्यता संपली असून, अमेरिका आणि इराणमध्ये पुन्हा एकदा मोठा संघर्ष सुरू होण्याची चिन्हे आहेत.

## शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधान परिषदेची ऑफर?

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित



निवडणूक तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार आहे. भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. विधान परिषदेच्या १० जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षात इच्छुकांची मोठी गर्दी दिसत आहे. अशातच विधानपरिषदेच्या निवडणुकीसंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांची भेट झाली आहे. शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधानपरिषदेची ऑफर देण्यात आल्याची माहिती खुद्द बच्चू कडू यांनी दिली आहे.

## महिलाच विरोधकांना वठणीवर आणतील –मुख्यमंत्री फडणवीस

### महिला आरक्षण विधेयक २०२९ मध्ये लागू होईल

**मुंबई (प्रतिनिधी)–** सामाजिक आणि आर्थिक बाबतीत भारत हा महत्त्वाचा देश ठरेल, अशी १७ एप्रिलला अपेक्षा होती. महिला आरक्षणाचे विधेयक मंजूर होणार होतं. सर्वजण मदत करतील अशी अपेक्षा होती. मात्र डीएमके, एनसीपी शप, समाजवादी, शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस यांनी महिला मानसिकतेचे प्रदर्शन केलं, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

लोकसभेत महिला आरक्षण विधेयक रद्द झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी सोमवारी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या खासदार ज्योती वाघमारे, शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे, मंत्री मेघना बोर्डीकर, मंत्री आदिती तटकरे, भाजपच्या आमदार चित्रा वाघ, मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित होते.

महिला विधेयकाची विरोधकांकडून भ्रूणहत्या करण्यात आली. आनंदोत्सव देखील त्यानंतर साजरा केला. हे समाजसुधारकांच्या विचारांवर केलेले



तांडव होते. महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जन्मशताब्दी सुरु आहे. परंतु महात्मा ज्योतिबा फुलेंच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम झाले. हे सगळे पक्ष एक्सपोज झाली आहेत, अशी टीका देवेंद्र फडणवीसांनी केली. लोकशाहीत महिला सहभागाचा मृत्यू झाला आहे, हत्यारे विरोधी पक्ष आहेत, असा घणाघातही देवेंद्र फडणवीसांनी केला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, १९७६ ला देशात डिलिमिटेशन झालं. संविधान संशोधन करत १९७१ ची लोकसंख्या फ्रीज ठेवत २००० सालापर्यंत डिलिमिटेशन होणार नाही, असा निर्णय झाला. २००२ साली कमिशन तयार झालं, तेव्हा दक्षिणेवर अन्याय होऊ नये म्हणून २००२ साली २० वर्षांची वाढ दिली. ७१ सालच्या लोकसंख्येवर डिलिमिटेशन झालं. २०२३ साली महिला आरक्षणासाठी संशोधन झालं तेव्हा सेन्सस आणि डिलिमिटेशन लागू करत संशोधन झालं. २०२३ च्या संविधान संशोधनानुसार ही विधेयकं आलीत. सगळी आकडेवारी येईपर्यंत २०२८ उजाडेल. २०२३ ला निर्णय घेतला होता, त्यानुसार डिलिमिटेशन करायचं आणि कुठल्याही परिस्थितीत २०२९ ला महिला आरक्षण लागू होईल आणि महिला निवडून येतील.

लोकसभेत ५४३ जागा भारताच्या संसदेत असतील, असं १९७१ साली ठरलं होतं. तेव्हा लोकसंख्या ४५ कोटी होती आणि आता १४० कोटी लोकसंख्या आहे. पिपल्स रिप्रेझेन्टेशन क्टसोबत प्रतारणा होईल. उत्तर आणि दक्षिण वाद संपवण्याचे प्रयत्न या विधेयकात केले होते. लोकशाहीत महिला सहभागाचा मृत्यू झाला आहे, हत्यारे विरोधी पक्ष आहेत. नेहमीच काँग्रेस आणि साथीदारांची अशी प्रवृत्ती राहिली आहे. त्यांनी सातत्याने महिला विरोधी धोरणं घेतली, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला.

## मोदींच्या हस्ते उद्घाटनाच्या २४ तासांपूर्वीच रिफायनरीमध्ये आग

**बालोत्रा (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राजस्थानमधील एका रिफायनरीचे उद्घाटन नियोजित होते. या कार्यक्रमाला अवघे २४ तास उरले असताना, त्या रिफायनरीमध्ये भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. बालोत्रा येथील पचपद्रा येथे असलेली ही रिफायनरी भारतातील पहिली 'ग्रीनफिल्ड' इंटिग्रेटेड रिफायनरी आणि पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्स असून, हा हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि राजस्थान सरकार यांनी मिळून सुरू केलेला प्रकल्प आहे.

## राज्यातील नऊ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

- योगेश गुप्ता गडचिरोलीचे डीआयजी
- राजकुमार शिंदे वाशिमचे पोलीस अधीक्षक

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील नऊ जिल्ह्यांमधील पोलीस प्रशासनात मोठे फेरबदल करण्यात आले असून वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

या आदेशानुसार तुषार दोशी यांची सातारा येथून सांगली येथे पोलीस अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे. तर निखिल पिंगळे यांची पुणे येथील पोलीस उपआयुक्त पदावरून सातारा येथे पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संदीप घुगे यांना सांगलीवरून मुंबईतील राज्य गुप्तवार्ता विभागात पोलीस उपआयुक्त (सुरक्षा) म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरून तुषार दोषी चांगलेच चर्चेत आले होते. शिवसेनेने त्यांच्या निलंबनाची मागणी केली होती. मात्र मुख्यमंत्र्यांनी त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवलं होतं. आता मात्र त्यांच्या बदलीचे आदेश काढण्यात आले आहेत.

योगेश गुप्ता यांना कोल्हापूरवरून गडचिरोली परिक्षेत्रात पोलीस उपमहानिरीक्षक (अतिरिक्त जबाबदारी) म्हणून नेमण्यात आले आहे. तर निलोत्पल यांची गडचिरोलीवरून कोल्हापूर येथे अधीक्षक म्हणून बदली झाली आहे. एम. रमेश यांना गडचिरोली येथेच पोलीस अधीक्षक म्हणून पदोन्नतीसह नियुक्त करण्यात आले आहे.

महेश्वर रेड्डी यांची जळगाववरून पुण्यातील राज्य गुन्हे अन्वेषण विभागात बदली करण्यात आली आहे. तर श्रीकांत धिवरे यांची धुळेवरून जळगाव येथे अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राजकुमार शिंदे यांना पुणे येथून वाशीम येथे पोलीस अधीक्षक म्हणून पाठवण्यात आले आहे.

## पुढील ४-५ दिवसांत विदर्भ-मराठवाड्यात गारपिटीचे संकेत

### हवामान विभागाचा अंदाज; उत्तर आणि मध्य भारतात उष्णतेची प्रचंड लाट

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय हवामान विभागान देशातील हवामानाबाबत अत्यंत चिंताजनक अंदाज वर्तवला आहे. पुढील ४ ते ५ दिवस उत्तर-पश्चिम, मध्य आणि पूर्व भारतात भीषण उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, एका बाजूला कडक ऊन असतानाच दुसरीकडे अनेक राज्यांमध्ये वादळी पाऊस, विजांचा कडकडाट आणि गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे.

देशातील अनेक भागांत पारा ४० ते ४५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान पोहोचला आहे. महाराष्ट्रातील अकोला आणि वर्धा येथे तापमानाने ४५ अंशांचा उच्चांक गाठला आहे. उत्तर भारतात पुढील काही दिवसांत तापमान ३ ते ४ अंशांनी आणखी वाढण्याची शक्यता आहे. दिल्लीत २३ एप्रिलपर्यंत तापमान ४४ अंशांपर्यंत जाण्याचा अंदाज असून, दिवसासोबतच रात्रीचेही तापमान जास्त राहणार असल्याने नागरिकांना दिलासा मिळण्याची चिन्हे नाहीत.

उष्णतेच्या लाटेसोबतच मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. ताशी ३० ते ७० किमी वेगाने वारे वाहतील आणि अनेक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. छत्तीसगड आणि मध्य प्रदेशातही अशाच प्रकारचे निसर्गाचे रौद्र रूप पाहायला मिळू शकते.

हवामानातील या टोकाच्या बदलांमुळे झाडे उन्मळणे, वीज पुरवठा खंडित होणे आणि उभ्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. विशेषतः फळबागांना गारपिटीचा मोठा फटका बसू शकतो.

वाढत्या तापमानामुळे लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींना उष्णतेचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे उन्हात जास्त वेळ जाणे टाळा आणि शरीरात पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवा. ओआरएस, ताक, लिंबू पाणी आणि नारळ पाण्याचे सेवन करा. वादळ किंवा विजांचा कडकडाट सुरू असताना झाडाखाली उभे राहू नका, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## शेतजमिनीच्या वाटणीवरील नोंदणी फी रद्द; राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा देत राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क संपूर्ण माफ केले आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाकडून सोमवारी जारी करण्यात आले आहे.

आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांसह, आपसातील संमतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री ददेवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे.

शासनाने २३ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, कलम ८५ अन्वये एकाच कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. या कलमांतर्गत वाटणीपत्राचे अधिकार तहसीलदारांना आहेत. परंतु, अनेक नागरिक तहसीलदारांकडे न जाता थेट दुय्यम निबंधक कार्यालयात आपसातील संमतीने वाटणीपत्र नोंदणीसाठी सादर करत होते. अशा वेळी मूळ अधिसूचनेत स्पष्ट तरतूद नसल्याचे कारण देत दुय्यम निबंधक कार्यालयांकडून नोंदणी शुल्क आकारले जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते.

## अर्धापूरजवळ कार थेट आखाड्यात घुसली, शेतमजूर महिलेचा मृत्यू

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तामसा ते अर्धापूर रोडवर सोमवार, दि.२० एप्रिल रोजी भरधाव कार चालकाचा ताबा सुटलेली कार रस्त्यालगतच्या एका आखाड्यात घुसल्याने तिथे विश्रांतीसाठी बसलेल्या ३८ वर्षीय शेतमजूर महिलेला कारने चिरडले. या हृदयद्रावक घटनेत गंभीर जखमी झालेल्या मंगलबाई साहेबराव शिंदे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून या घटनेमुळे संपूर्ण लोण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

लोण ता. अर्धापूर येथील मंगलबाई साहेबराव शिंदे (वय ३८) ह्या दिवसभर शेतात काम केल्यानंतर दुपारी आखाड्यात विसाव्यासाठी बसल्या होत्या. त्याचवेळी तामसाहून अर्धापूरच्या दिशेने



जाणारी एक कार अत्यंत वेगात होती. अचानक चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही कार रस्त्यावरून थेट आखाड्याच्या दिशेने झेपावली. काही समजण्यापूर्वीच या कारने मंगलबाईंना जोरदार धडक दिली आणि काही अंतरापर्यंत फरफटत नेले.

हा अपघात इतका भीषण होता की, मंगलबाई रक्ताच्या थारोळ्यात पडल्या आणि आखाड्याचेही मोठे नुकसान झाले. अपघाताचा आवाज होताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांनी क्षणाचाही विलंब न लावता जखमी मंगलबाईना स्वतःच्या वाहनात टाकून तातडीने नांदेड येथील रुग्णालयात दाखल केले.

रुग्णालयात डॉक्टरांनी मंगलबाईवर उपचार सुरू केले, मात्र मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक होती. अखेर सायंकाळच्या सुमारास उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. एका कष्टकरी महिलेचा असा अचानक आणि भीषण अंत झाल्याने शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.


## शेअर बाजारात दाणादाण; गुंतवणूकदारांचे एका दिवसात १९ हजार कोटींचे नुकसान

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सोमवारी शेअर बाजारात माफक वाढ होऊनही, मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समधील विक्रीमुळे शेअर बाजारातील गुंतवणूकदारांच्या संपत्तीत अंदाजे २०,००० कोटी रुपयांची घट झाली. आजच्या व्यवहारानंतर बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ४६५.४५ लाख कोटी रुपयांपर्यंत (तात्पुरते) घसरले. गेल्या आठवड्यातील शेवटचा व्यवहार दिवस असलेल्या शुक्रवारी, त्यांचे बाजार भांडवल ४६५.६४ लाख कोटी रुपये होते. परिणामी, आजच्या व्यवहारात गुंतवणूकदारांना अंदाजे १९ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले.

## कोल्हापुरात भिंत कोसळून एका प्राध्यापिकेसह शाळकरी विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू

**कोल्हापूर (प्रतिनिधी)–** कोल्हापूर जिल्ह्याच्या आजरा शहरात सोमवारी एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. शहरातील 'वाणी गल्ली' परिसरात एका जुन्या घराची भिंत पाडण्याचे काम सुरू असताना, ही भिंत अंगावर कोसळून एका प्राध्यापिकेसह शाळकरी विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू झाला. या भीषण दुर्घटनेत अन्य एक महिला गंभीर जखमी झाली आहे. वैष्णवी तुकाराम भोसले (इयत्ता ६ वी वय १४ वर्षे) आणि ज्योती नितीन कुंभार (प्राध्यापिका, वय ४५ वर्षे) अशी दुर्दैवी मृत्यूमुखी पडलेल्यांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आजरा येथील वाणी गल्लीत डॉ. देशपांडे यांच्या मालकीचे एक जुने घर आहे. या घराची दक्षिणेकडील बाजूची आणि रस्त्यालगतची भिंत जेसीबीच्या साहाय्याने पाडण्याचे काम सुरू होते. याच वेळी रस्त्यावरून जात असलेल्या दोघींच्या अंगावर अचानक भिंतीचा मोठा भाग आणि मातीचा ढिगारा कोसळला. ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्याने दोघींचाही जागीच अंत झाला. दुर्घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या ललिता भोसले यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या गडहिंग्लज येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जुन्या घराचे पाडकाम सुरू असताना सुरक्षेची पुरेशी काळजी घेतली होती का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.






## उधमपूरमध्ये प्रवासी बस खड्ड्यात कोसळून अपघात; १५ जणांचा मृत्यू

**उधमपूर (प्रतिनिधी)–** जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात भीषण रस्ते अपघाताची घटना घडली आहे. या दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढून १५ वर पोहोचली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात सोमवारी सकाळी रामनगर परिसरातील कागोट गावाजवळ घडला. एका प्रवासी बसचा डोंगराळ रस्त्यावर ताबा सुटल्याने ती खोल दरीत कोसळली.

माहितीनुसार, ही बस दुर्गम गावातून उधमपूरकडे जात होती. यादरम्यान हा अपघात घडला आहे. अपघाताच्या वेळी बसमध्ये मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करत होते. त्यामध्ये सरकारी कर्मचारी, शाळा व महाविद्यालयातील शिक्षक तसेच विद्यार्थ्यांचा



समावेश असल्याचे सांगितले जात आहे. सकाळी सुमारे ९.४० वाजण्याच्या सुमारास कघोट परिसरात वळण घेताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस दरीत कोसळली. या अपघातात अनेक जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे.

घटनेनंतर तातडीने मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले. प्रशासन आणि पोलिसांच्या पथकांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात पोहोचवले. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, अपघाताच्या कारणांचा तपास सुरू आहे. परिसरात शोककळा पसरली असून प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे.

अपघातानंतर केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी उधमपूरच्या उपायुक्तांशी दूरध्वनीवरून चर्चा केली आणि गंभीर जखमींना एअरलिफ्ट करण्याची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती दिली. मदत व बचावकार्य वेगाने सुरू असून प्रशासनाशी सतत संपर्कात असल्याचेही त्यांनी सांगितले.

## जपानमध्ये ७.४ रिश्टर स्केलचा भीषण भूकंप; त्सुनामीचा इशारा, १० फूट उंच लाटांचा धोका

**टोकिओ (वृत्तसंस्था)–** उत्तर जपानमध्ये सोमवारी भूकंपाचे धक्के जाणवले. या भागात ७.४ रिश्टर स्केलचा हादरा जाणवल्याची माहिती समोर आली आहे. जपानच्या हवामान विभागाने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, या भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा देण्यात आला असून, तीन मीटर उंच (१० फूट) लाटांची शक्यता वर्तवली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, भूकंपाचा धक्का एवढा तीव्र होता की, टोकियोमध्ये अनेक इमारतींना हादरा बसला असून, कत्येक किलोमीटर लांब याचा प्रभाव दिसून आला. भूकंपाचे हादरे जाणवल्यानंतर सुमारे ४० मिनिटांनी ८० सेंटीमीटर (३१ इंच) उंच लाटा इवाटे येथील कुजी बंदराला धडकल्या, अशी माहिती जपान हवामान विभागाने माहिती प्रसिद्ध केली आहे. यानंतर प्रशासनाने किनाऱ्या जवळील नागरिकांना या ठिकाणावरुन लांब जाण्याचे आवाहन केले



आहे.

किनारी भागातील नागरिक आणि नदीजवळील नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. जमिनीवरुन उंच असणाऱ्या आणि बचावकार्य करण्यास सोपे असणाऱ्या ठिकाणी नागरिकांना आश्रय घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. त्सुनामीच्या उंच लाटांमुळे नुकसानाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे. त्सुनामीचा धोका लक्षात घेता नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत सुरक्षित ठिकाणे सोडू नयेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
**केशव घोणसे पाटील**

# डिजिटल संवादात हरवले नाते

डिजिटल संवादाच्या युगात भारताने अभूतपूर्व कनेक्टिव्हिटी साधली आहे. इंटरनेट आणि मेसेजिंग ॲप्समुळे माहितीचा प्रवाह वेगवान झाला, संवाद सुलभ झाला. मात्र या वेगवान प्रवाहामागे एक गंभीर आणि अदृश्य संकटही निर्माण झाले आहे, ती म्हणजे वेळेची, मानसिक शक्तीची आणि विवेकाची नासाडी. आज जर कोट्यवधी भारतीय दररोज केवळ काही मिनिटे व्हॉट्सॲप संदेश वाचण्यात आणि पुढे पाठवण्यात घालवत असतील, तर देशाच्या उत्पादकतेचे लाखो तास रोज नकळत वाया जात आहेत. हे नुकसान आकडेवारीत दिसत नाही, पण त्याचे परिणाम समाजाच्या विचारक्षमतेवर स्पष्टपणे उमटत आहेत. ही समस्या केवळ वेळेच्या अपव्ययाची नाही; ती 'डिजिटल नॉईज' अर्थात डिजिटल धुडगूस या वाढत्या कुसंस्कृतीची आहे. काम, शिक्षण किंवा अर्थपूर्ण संवादाऐवजी पुनरावृत्ती होणारे संदेश, व्हीडीओ आणि शुभेच्छांचा पूर आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे. हजारो वर्षांच्या मानवी प्रगतीने घडवलेली उत्पादकता जणू काही या डिजिटल गोंगाटात हळूहळू पूर्णपणे विरघळत आहे. या वर्तनामागे केवळ अज्ञान कारणीभूत नाही. ही एक सामाजिक मान्यता मिळवण्याची नवी अर्थव्यवस्था आहे. आजच्या अतिजोडलेल्या जगात 'दिसणे' हीच एक प्रकारची चलनप्रणाली बनली आहे. एखादा संदेश पुढे पाठवणे म्हणजे आपण सक्रिय आहोत, सहभागी आहोत, हे दाखवण्याचा सोपा मार्ग झाला आहे. तसेच जेवढे लाइक्स मिळतील तेवढे आपण जनमान्य झालो आहोत, असा विचार. त्यामुळे संदेशाच्या आशयापेक्षा तो पाठवण्याची कृतीच महत्त्वाची ठरते. दररोजच्या वापरात हे स्पष्ट दिसते. दररोज चहा पिणाऱ्यांनी हे नक्की वाचा अशा प्रकारचा कोणताही वैज्ञानिक आधार नसलेला संदेश येतो आणि क्षणार्धात तो अनेक गटांमध्ये पुढे पाठवला जातो. काही मिनिटांत तोच संदेश दुसऱ्या गटातून परत येतो आणि वारंवार दिसल्यामुळे तो अधिक विश्वासार्ह वाटू लागतो. अशा प्रकारे चुकीची माहिती 'विश्वास' मिळवते, तेही कोणत्याही वैज्ञानिक पडताळणीशिवाय. यातूनच एक अदृश्य 'फॉरवर्डिंग वर्ग' (ढकला रे ढकला पुढे ढकला) तयार झाला आहे. हा वर्ग काहीही निर्माण करत नाही, सत्यता तपासत नाही; मात्र माहितीचा प्रसार मोठ्या प्रमाणावर करतो. थोडके लोक माहिती तयार करतात, तर बहुसंख्य लोक ती न तपासता पुढे ढकलतात. भारतात ७० कोटींपेक्षा अधिक इंटरनेट वापरकर्ते आहेत आणि मेसेजिंग ॲप्सचा वापर प्रचंड प्रमाणात होतो. मात्र माहिती फिल्टर करण्याची सवय अजूनही कमकुवत आहे. एवढेच नव्हे तर शेजारी असलेल्या व्यक्तीशी न बोलता लोक व्हाट्सअपवर दूर कुठेतरी असलेल्या व्यक्तीशी संवाद साधत असतो. हा खरंतर संवाद नसतोच, तो एक अस्तित्त्व सिद्ध करण्याची आभासी लढाई असते. तंत्रज्ञानाने ही प्रक्रिया अत्यंत सोपी केली आहे. पूर्वी माहिती शेअर करण्यासाठी विचार करावा लागायचा; आज केवळ एका क्लिकवर ती हजारो लोकांपर्यंत पोहोचते. कोणताही थांबा नाही, विचार नाही. परिणामी चुकीच्या माहितीचा एक ' विनाअडथळा' प्रवाह निर्माण झाला आहे. याचे परिणाम गंभीर आहेत. कोवीड-१९ काळात गरम पाणी पिणे, विशिष्ट औषधी वनस्पती वापरणे अशा अप्रमाणित उपायांची मोठ्या प्रमाणावर देवाणघेवाण झाली. अनेकांनी ते खरे मानून वापरले. जागतिक आरोग्य संघटनेने यालाच 'इन्फोडेमिक' अर्थातच अज्ञानाचा आजार असे नाव दिले जिथे चुकीची माहिती रोगाइतकीच वेगाने पसरते. या प्रक्रियेमुळे मानसिक थकवा वाढतो, लक्ष केंद्रित करण्याची क्षमता कमी होते आणि प्रश्न विचारण्याची सवयही हळूहळू कमी होते. या माध्यमातून पुनरावृत्तीमुळे विकृती अधिक वाढते. कधीही न ऐकलेली हनुमान चालीसा असा दावा करणारे व्हीडीओ अनेक गटांमध्ये फिरतात. दर्जा कमी असला, दावे अतिशयोक्त असले तरी वारंवार पाहिल्यामुळे ते सत्य वाटू लागते. भारतीय सामाजिक गटांची रचनाकुटुंब, मित्र, शेजारी, ही विश्वासावर आधारित असल्याने ओळखीच्या व्यक्तीकडून आलेला संदेश सहज स्वीकारला जातो. चांगल्या हेतूने पाठवलेला संदेश विवेकाच्या कसोटीवर तपासला जात नाही. यात पुन्हा 'गुड मॉर्निंग' आणि गुड इव्हिनिंग या कुसंस्कृतीने वेगळेच रूप धारण केले आहे. दररोज तेच फुले, तोच सूर्योदय, तीच शुभेच्छा. यात नवीन काहीच नसते, तरीही ती सवयीने पुढे पाठवली जातात. संवादाचा हेतू हरवतो आणि एक प्रकारची यांत्रिक सवय तयार होते. तसेच यातून आम्ही तुमच्या खूप प्रेमाचे आहोत, असेही दाखविण्याचा प्रयत्न असतो. मुळात प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही, तर वर्तनाचा आहे. जेव्हा संदेश पुढे पाठवणे आपोआप घडते, तेव्हा विचार करणे ऐच्छिक होते. जेव्हा प्रमाण वाढते, तेव्हा गुणवत्ता घसरते आणि जेव्हा सर्व काही शेअर केले जाते, तेव्हा काहीच गाळले जात नाही. या पार्श्वभूमीवर काही अस्वस्थ करणारे प्रश्न उभे राहतात. समजून घेण्याची प्रक्रिया कधी हरवली? पुनरावृत्तीला विश्वासार्हता कधी मिळाली? अप्रमाणित माहिती सामाजिक महत्त्वाचे साधन कधी बनली? केवळ सक्रियतेला योगदान समजणारा समाज बौद्धिकदृष्ट्या कमकुवत होण्याचा धोका पत्करतो. म्हणून ह्या भस्मासुरावर वेळीच आवर घालणे गरजेचे आहे अन्यथा आपला देश अविवेकी तरुण पिढीच्या हातात जाईल आणि त्यामुळे होणारा परिणाम भयानक आणि दूरगामी असेल.

# अभ्यासक्रमाविना परीक्षा : उपवर्गीकरणाच्या नावाखाली लोकशाहीची कसोटी

महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा सध्या राज्याच्या सामाजिक आणि राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने दिनांक १६ मार्च २०२६ रोजी शासनाला आपला अहवाल सादर केला. त्यानंतर दि. १० एप्रिल २०२६ रोजी शासन निर्णयाद्वारे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली या शासन निर्णयाद्वारे अहवालावर जनतेकडून आक्षेप, मते आणि निवेदने मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. इच्छुकांना ई-मेलद्वारे नोंदणी करून आपले अभिप्राय सादर करण्याची मुदत सुरुवातीला १५ एप्रिल २०२६ पर्यंत देण्यात आली होती, जी नंतर आणि दि. १३ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रेस नोटद्वारे वाढवून ३० एप्रिल २०२६ करण्यात आली. या सर्व प्रक्रियेचा वरकरणी हेतू लोकशाही पद्धतीने जनमत जाणून घेणे असा दिसत असला, तरी प्रत्यक्षात या प्रक्रियेतील अनेक विसंगती आणि विरोधाभास समोर येतात.

सर्वात मूलभूत आणि गंभीर प्रश्न असा आहे की, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविली जात आहेत, तो अहवालच जर सार्वजनिक केला गेला नसेल, तर सामान्य नागरिकांनी नक्की काय वाचून, काय समजून आणि कोणत्या आधारावर आपले मत व्यक्त करायचे? ही परिस्थिती अक्षरशः अभ्यासक्रमाशिवाय परीक्षा देण्यासारखी आहे. ज्यांना 'अ ब क ड' काय आहे हेच माहीत नाही, त्यांनी त्या परीक्षेत उत्तरे लिहायची कशी? हा प्रश्न केवळ उपरोधिक नाही, तर तो लोकशाही प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह उभा करणारा आहे. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही धोरणात्मक निर्णयासाठी जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो, परंतु तो सहभाग अर्थपूर्ण आणि माहितीपूर्ण असला पाहिजे. माहितीच उपलब्ध नसेल, तर सहभाग केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहतो. या संदर्भात पाहिले तर, अहवाल सार्वजनिक न करता मते मागविण्याची प्रक्रिया ही केवळ 'लोकशाहीचा आव आणणारी' ठरते, प्रत्यक्षात ती लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणणारी आहे.

विशेषतः, महाराष्ट्रातील अनुसूचित जातींमधील मोठा वर्ग हा अजूनही सामाजिक-



आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आणि माहितीच्या अभावामुळे वंचित आहे. अशा परिस्थितीत ई-मेलद्वारे मते मागविण्याची अट ही स्वतःमध्येच भेदभाव करणारी ठरते. ग्रामीण भागातील, डिजिटल साधनसंपत्ती नसलेल्या किंवा संगणक साक्षरता नसलेल्या व्यक्तींना या प्रक्रियेत सहभागी होणे जवळजवळ अशक्यच आहे. म्हणजेच, ज्या घटकांवर या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम होणार आहे, त्यांनाच या प्रक्रियेपासून दूर ठेवले जात आहे. यातून एक मोठा विरोधाभास समोर येतो की सामाजिक न्यायाच्या नावाखाली राबविण्यात येणारी प्रक्रिया प्रत्यक्षात सामाजिक अन्याय वाढविणारी ठरत आहे. उपवर्गीकरणाचा उद्देश जर अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता कमी करणे हा असेल, तर त्या विषमतेची अचूक ओळख आणि त्यावर आधारित उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु अहवालाची माहितीच उपलब्ध नसताना, या विषमतेचे स्वरूप काय आहे, त्याची कारणे काय आहेत आणि प्रस्तावित उपाययोजना कोणत्या आहेत, हेच समजत नसल्याने, संपूर्ण प्रक्रिया अस्पष्ट आणि संशयास्पद वाटू लागते.

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती ही तीन वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची आहे. या समितीमध्ये समाजशास्त्रज्ञ, तज्ज्ञ किंवा अनुसूचित जातींचे प्रतिनिधी नसल्याने, या प्रक्रियेतील 'प्रतिनिधित्वाचा अभाव' प्रकर्षाने जाणवतो. जे लोक या निर्णयामुळे थेट प्रभावित होणार आहेत, त्यांचा आवाज या समितीत प्रतिबिंबित होत नाही, ही बाब चिंताजनक आहे. याशिवाय, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविण्यासाठी पाच-सहा दिवस आणि सुनावणीसाठी सुरुवातीला केवळ दोन दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, ही बाबही लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने अपुरी आणि असमाधानकारक आहे. जरी नंतर मुदत वाढविण्यात आली असली, तरी सुरुवातीचा निर्णय हा घाईघाईत आणि अपुऱ्या तयारीत घेतल्याचे स्पष्ट होते. इतक्या महत्त्वाच्या विषयावर व्यापक चर्चा, जनजागृती आणि संवाद आवश्यक असतो, जो येथे दिसून येत नाही.

उपवर्गीकरणाच्या माध्यमातून काही जातींना अधिक लाभ देण्याचा प्रयत्न केला गेला, तर इतर जातींमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. यामुळे सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता आहे. सामाजिक न्यायाच्या नावाखाली जर नव्या प्रकारची विषमता निर्माण होत असेल, तर त्या धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते. याशिवाय, या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, प्रतिनिधित्वाचा अभाव, आणि सर्वसमावेशकतेचा अभाव हे तीन मोठे दोष स्पष्टपणे दिसून येतात. हे दोष दूर केल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे म्हणजे समाजावर प्रयोग करण्यासारखे आहे. आणि समाजावर केलेले असे प्रयोग दीर्घकालीन दृष्टीने हानिकारक ठरू शकतात. म्हणूनच, शासनाने या संपूर्ण प्रक्रियेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे, त्यावर व्यापक चर्चा घडवून आणणे, विविध स्तरांवरील प्रतिनिधींना सहभागी करून घेणे आणि त्यानंतरच कोणताही निर्णय घेणे, हीच योग्य दिशा ठरू शकते. अन्यथा, हा निर्णय सामाजिक न्यायाच्या नावाखाली सामाजिक विषमता वाढविणारा ठरू शकतो.

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे काही महत्त्वाचे निर्णय लक्षात घेणे आवश्यक आहे. काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने उपवर्गीकरणाला तत्त्वतः मान्यता दिली आहे, परंतु त्यासाठी अत्यंत कठोर अटी घातल्या आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, उपवर्गीकरण केवळ तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ आणि पुराव्यांवर आधारित असले पाहिजे. केवळ राजकीय किंवा प्रशासकीय सोयीसाठी असे विभाजन करता येणार नाही. याशिवाय, अशा उपवर्गीकरणामुळे कोणत्याही गटावर अन्याय होणार नाही, याची खात्री करणेही आवश्यक आहे. मात्र, येथेच एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की महाराष्ट्रातील या प्रक्रियेत अशा प्रकारचा वैज्ञानिक आणि पारदर्शक आधार कितपत उपलब्ध आहे? न्यायमूर्ती बदर समितीने सादर केलेला अहवाल सार्वजनिकच करण्यात आलेला नसल्याने, त्यातील आकडेवारी, विश्लेषण आणि शिफारसी यांचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करणे अशक्य झाले आहे. न्यायालयाने अपेक्षित केलेली 'वस्तुनिष्ठता' आणि 'पारदर्शकता' या दोन्ही बाबी येथे प्रश्नचिन्हाखाली येतात. घटनात्मक दृष्टिकोनातून पाहिले असता, ही प्रक्रिया 'नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वां'शीही विसंगत ठरू शकते. नैसर्गिक न्यायाचा एक मूलभूत सिद्धांत असा आहे की, कोणत्याही निर्णयाचा परिणाम ज्यांच्यावर होणार आहे, त्यांना त्या निर्णयाच्या आधारभूत माहितीची पूर्ण जाणीव असली पाहिजे आणि त्यांना आपले मत मांडण्याची संधी दिली पाहिजे. परंतु येथे परिस्थिती उलट आहे. माहिती न देता मत मागविणे. त्यामुळे ही प्रक्रिया 'ऐकले जाण्याचा हक्क' (Right to be heard) या तत्त्वालाच बाधा आणणारी ठरते.

या सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी काही ठोस उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे ही अत्यंत मूलभूत गरज आहे. अहवालातील आकडेवारी, विश्लेषण आणि शिफारसी जनतेसमोर मांडल्याशिवाय कोणतीही चर्चा अर्थपूर्ण ठरू शकत नाही. पारदर्शकता ही विश्वासाची पायाभूत अट आहे, आणि ती पूर्ण केल्याशिवाय लोकशाही प्रक्रियेची वैधता निर्माण होऊ शकत नाही. दुसरे म्हणजे, मते आणि आक्षेप नोंदविण्याची प्रक्रिया अधिक सर्वसमावेशक करणे आवश्यक आहे. केवळ ई-मेलपुरती मर्यादित न ठेवता, जिल्हास्तरावर सार्वजनिक सुनावण्या, ग्रामसभांमधून चर्चा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून अभिप्राय गोळा करणे, अशा विविध माध्यमांचा वापर करणे गरजेचे आहे. यामुळे ग्रामीण आणि उपेक्षित घटकांनाही आपले मत मांडण्याची संधी मिळेल. तिसरे म्हणजे, समितीच्या संरचनेत विविधता आणणे आवश्यक आहे. समाजशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, अनुसूचित जातींचे प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी आणि नागरी समाजातील तज्ज्ञ यांचा समावेश केल्यास निर्णय प्रक्रिया अधिक समतोल आणि वास्तवाधारित होऊ शकते. केवळ प्रशासकीय दृष्टिकोनावर आधारित निर्णय घेणे हे अपुरे ठरते. चौथे म्हणजे, उपवर्गीकरणाचा निर्णय घेताना 'डेटा-आधारित धोरण' (evidence-based polic) स्वीकारणे अत्यावश्यक आहे. कोणत्या जाती खरोखरच अधिक मागास आहेत, त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती काय आहे, त्यांना मिळालेल्या संधींचे वितरण कसे आहे. या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. अन्यथा, उपवर्गीकरण हे केवळ अनुमानांवर आधारित ठरेल, जे दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकते. पाचवे म्हणजे, या संपूर्ण प्रक्रियेत जनजागृतीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीतील नागरिकांना त्यांच्या हक्कांबद्दल, प्रस्तावित बदलांबद्दल आणि त्याच्या परिणामांबद्दल माहिती देणे ही शासनाची जबाबदारी आहे. माहितीशिवाय सहभाग हा केवळ औपचारिक राहतो, आणि औपचारिक सहभागातून न्याय्य निर्णय घडत नाहीत.

शेवटी, अभ्यासक्रमाविना परीक्षा ही उपमा केवळ भाषिक अलंकार नसून, ती या संपूर्ण प्रक्रियेचे वास्तव प्रतिबिंब आहे. जेव्हा नागरिकांना माहिती न देता त्यांच्याकडून मते मागविली जातात, तेव्हा ती लोकशाही प्रक्रिया न राहता केवळ औपचारिकता ठरते. आणि जेव्हा लोकशाही औपचारिकतेपुरती मर्यादित राहते, तेव्हा तिच्या समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूळ तत्त्वांना धक्का बसतो. म्हणूनच, आज गरज आहे ती केवळ निर्णय घेण्याची नाही, तर योग्य पद्धतीने निर्णय घेण्याची. पारदर्शकता, समावेशकता आणि न्याय्यतेच्या आधारावरच कोणतेही धोरण समाजासाठी हितकारक ठरू शकते. अन्यथा, सामाजिक न्यायाच्या नावाखालीच सामाजिक विषमता वाढण्याचा धोका निर्माण होतो आणि हीच बाब या संपूर्ण प्रक्रियेबाबत सर्वात मोठी चिंता निर्माण करणारी ठरते.

**-ॲड. सुनिल बगाटे व डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# पृथ्वीचा समतोल राखणे काळाची गरज

मानवाला सुखाने जगायचे व आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला व पृथ्वीला तिच्या महाविनाशापासून वाचविता आले पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वछ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.

वसुंधरा किंवा पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरण संवर्धन जागृती करण्यासाठी जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत २२ एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्रे २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुवृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी-संपातबिंदू होतो, तोच पृथ्वी दिन पाळतात. महाभारतामध्ये भारताच्या वर्णनाप्रमाणेच जगातील अन्य भौगोलिक स्थळांचे वर्णन आढळते. उदा. मंगोलियाचे गोबी वाळवंट, इजिप्तची नाईल नदी, लाल समुद्र इत्यादी इत्यादी. तसेच महाभारतातल्या भीष्म पर्वातील जम्बुखंड- निर्माण पर्वात संपूर्ण पृथ्वीचे मानचित्र सांगितले आहे. ते असे-

सुदर्शनं प्रवक्ष्यामि द्वीपं तु कुरुनन्दन।
परिमण्डलो महाराज द्वीपोसौ चक्रसंस्थितः।।
यथाहि पुरुषः पश्येदादर्शे मुखमात्मनः।
एवं सुदर्शनद्वीपो दृश्यते चन्द्रमण्डले।।
द्विरंशे पिप्पलस्तत्र द्विरंशेच शशो महान्।।

याचा अर्थ- हे कुरुनन्दन! सुदर्शन नावाचे हे द्वीप चक्राप्रमाणे गोलाकार स्थित आहे. ज्याप्रमाणे पुरुष आरशात आपला चेहरा बघतो, त्याचप्रमाणे हे द्वीप चंद्रावरती दिसते. याच्यातील दोन अंशांमध्ये पिंपळाची



पाने आणि दोन अंशांमध्ये मोठा ससा दिसतो.

पृथ्वी दिनासाठी जॉन मक्डॉनेल याने बनवलेला अनधिकृत ध्वज पर्यावरण रक्षणाची शिकवण देण्याच्या हेतूने फडकविला जातो. अमेरिकेचा सिनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल १९७० रोजी पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. पहिला पृथ्वी दिन अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पाळला गेला. तरीही त्या कार्यक्रमाचे राष्ट्रीय समन्वयक असलेले डेनिस हेस यांनी स्थापलेल्या संस्थेने इ.स. १९९० साली १४१ देशांमध्ये या दिवसाचे आयोजन केले व पृथ्वी दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला. सद्या अर्थ डे नेटवर्क या संस्थेच्या समन्वयाने १७५ देशांमधून हा दिवस साजरा केला जातो. इ.स. २००९ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली. पृथ्वी हा सूर्यमालेतील सूर्यापासूनच्या अंतरानुक्रमे तिसरा तर आकारानुक्रमे पाचवा ग्रह आहे. सूर्यमालेतील खडकाळ ग्रहांमध्ये हा सर्वांत मोठा आहे. पृथ्वीला निळाग्रह असेही म्हणतात. जिथे जीवन आहे, अशी पूर्ण विश्वात ही एकमेव ज्ञात जागा आहे. पृथ्वीची निर्मिती साधारणपणे ४५७ कोटी वर्षांपूर्वी झाली असावी. तिचा उपग्रह चंद्र साधारणपणे ४५३ कोटी वर्षांपूर्वीपासून तिला प्रदक्षिणा घालू लागला. हिचा व्यास १२,७५६ किमी एवढा आहे. सूर्यापासून तिचे अंतर साधारणपणे १४,९५,९७,८९० किमी एवढे आहे.

पृथ्वीला स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास २४ तास लागतात. तसेच सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करण्यास ३६५ दिवस लागतात. या ३६५ दिवसांच्या कालावधीला आपण एक वर्ष म्हणतो. पृथ्वी तिच्या स्वतःभोवती फिरण्याच्या आसापासून २३.५ अंशांनी कललेली आहे. याच स्थितीत ती स्वतःभोवती व सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करते, म्हणूनच पृथ्वीवर उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे ऋतुचक्र सुरू असते. मानवाला सुखाने जगायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वछ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.

पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश पोहचण्यासाठी साधारणत: ८ मिनिटे २० सेकंद लागतात. पृथ्वी सूर्याभोवती लंबवर्तुळाकार मार्गाने प्रदक्षिणा पूर्ण करते. या प्रदक्षिणेमध्ये थोडाजरी फरक पडला असता, तर पृथ्वीवर कदाचित जीवसृष्टी निर्माण झाली नसती. पृथ्वीची रचना, गुरुत्वाकर्षण, सूर्यापासूनचे ठराविक अंतर आणि पृथ्वीवर असलेले वातावरण यामुळेच तिच्यावर जीवसृष्टी निर्माण झाली असावी, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. पृथ्वीशिवाय इतर कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टी नाही. पृथ्वी स्वतः चुंबक असल्याने पृथ्वीभोवती चुंबकिय क्षेत्र आहे, या चुंबकीय क्षेत्रमुळे सूर्यापासून येणारे हानीकारक किरण पृथ्वीच्या धृवीय क्षेत्राकडे वळतात.

पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर भौगोलिक आणि जैविक प्रक्रियांनी तिच्यात खूप परिवर्तन झाले आहे. पृथ्वी आपल्या अक्षाभोवती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. ती तळाच्या उंचीचा हिस्टोग्राम तिच्या तळावर पाण्याची विपुलता एक अद्भूत वैशिष्ट्य आहे, जे सौर मंडळाच्या अन्य ग्रहांपासून या निळ्या ग्रहाला वेगळे करते. पृथ्वीच्या जलमंडळात मुख्यतः महासागर आहे, परंतु तांत्रिक रूपाने दुनियेत उपस्थित इतर पाण्याचे स्रोत जसे- अंतर्देशीय समुद्र, तलाव, नदी आणि दोन हजार मीटर खोल भूमिगत पाण्यासहित यात सामावले आहे. पाण्यातील सर्वात खोल जागा १०,९११.४ मीटर खोल प्रशांत महासागरमध्ये मारियाना ट्रेंचची चैलेंजर डीप आहे. कॅनडा मधील रॉकी पर्वत मोराइन लेकला दुर्लक्षित करतो. जीवन टिकवून ठेवणारा एक ग्रह म्हणजे जगणे अस्तित्वात नसले, तरीसुद्धा राहण्यायोग्य असे म्हटले जाते. पृथ्वी द्रव पाणी पुरवते- एक वातावरण जेथे जटिल सेंद्रिय अणू एकत्र येऊन संवाद साधू शकतात आणि चयापचय प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी पुरेशी ऊर्जा देऊ शकतात. माणूस चंद्रावर जाऊन तेथे वास्तव्य करण्याची भाषा- वल्गना करत आहे, मात्र त्याला या साध्या पृथ्वीवर धड चालता येत नाही. त्याच्या अशा बेजबाबदार चालण्या-वागण्यामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले, तर पृथ्वीचा महाविनाश अटळ आहे. म्हणून मानवजातीचा तळपट थांबविण्यासाठी मानवाने सावध वागलेच पाहिजे, हीच त्याची पूज्य बुद्धी ठरेल.

**-कृष्णकुमार निकोडे**
गडचिरोली.
मो. ७७७५०४१०८६

# मराठी शाळाच दर्जेदार

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात



टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात.

मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निंग, क्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात.

गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ - पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात. आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत देखील सीबीएएससीचा अभ्यासक्रम शिकवला जात आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळत आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे.

अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हंटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# बाळासाहेब आंबेडकरांनी मातंग समाजाची भूमिका ऐकावी; वर्गीकरणाला साथ द्यावी

## मातंग समाजाची पत्रकार परिषदेत मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –अनुसूचित जातींच्या आरक्षण वर्गीकरणाचा विषय अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. या संदर्भात समाजात गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप सकल मातंग समाज समन्वयक मारोती वाडेकर यांनी केला. नांदेड येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी मातंग समाजाची भूमिका स्पष्ट करीत बाळासाहेब आंबेडकर यांनी मातंग समाजाच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून वर्गीकरणाच्या लढ्याला साथ द्यावी, असे आवाहन केले.

वाडेकर पुढे म्हणाले की, वर्गीकरणाची मागणी ही कोणत्याही समाजाविरोधात नसून मागासलेल्या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आहे. अनुसूचित जातीतील ५९ जातींसाठी असलेल्या योजनांचा लाभ समान प्रमाणात मिळालेला नाही. उपलब्ध आकडेवारीनुसार बार्टी योजनांच्या सुमारे ७९ टक्के लाभ महार समाजाला, ९ टक्के चांभार समाजाला, १.४ टक्के भंगी समाजाला तर मातंग समाजाला केवळ ६ टक्के लाभ मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

मातंग समाजाला आंबेडकरविरोधी ठरविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी सांगितले की, मराठवाडा नामांतर लढ्यात शहीद पोचीराम कांबळे हे मातंग समाजातील होते. तसेच ॲट्रॉसिटी कायद्याच्या समर्थनातील आंदोलनातही मातंग समाजाचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यामुळे समाजाला बदनाम करण्याचे षडयंत्र थांबवावे, अशी मागणी त्यांनी केली.

लहुजी साळवे अभ्यास आयोग, अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण अभ्यास समिती तसेच बार्टीचा सविस्तर अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला असून, वर्गीकरणासाठी आवश्यक सर्व माहिती सरकारकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. कॅबिनेटच्या निर्णयानुसार बदर समितीकडे प्राप्त अर्ज व निवेदनांचा अभ्यास करून एक महिन्याच्या आत वर्गीकरणाचा आराखडा कॅबिनेटसमोर सादर करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा ठराव झाला होता. मात्र नव्याने अर्ज व आक्षेप मागवून प्रक्रिया लांबवली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

ऐतिहासिकदृष्ट्या मातंग समाज मागे राहिल्याचे नमूद करत वाडेकर म्हणाले की, १८७१ ते १९५२ या कालावधीत समाजातील काही जाती 'क्रिमिनल ट्राईब' यादीत होत्या. तब्बल ८३ वर्षे शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. निजामशाही काळातही सामाजिक संधी मिळाल्या नाहीत. त्यामुळे समाज शिक्षण व विकासात मागे राहिला.

१९६१, १९७१ व १९८१ च्या जनगणनेत मातंग समाज लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकावर होता. त्यामुळे १९६१ च्या जनगणनेचा आधार घेऊन वर्गीकरण करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ च्या निर्णयानुसार लाभापासून वंचित राहिलेल्या जातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आमचा लढा सुरू असून मागासलेपणाच्या आधारावर अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे वर्गीकरण झाल्यास मातंग समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## हदगाव शहरासाठी रिंगरोड बांधकामाबाबत केंद्रीय मंत्र्यांना निवेदन

**हदगाव (प्रतिनिधी)** –हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी हदगाव शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर तोडगा काढण्याकरिता शहरात रिंगरोड उभारण्याबाबत केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन दिले आहे.

केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हदगाव शहरातील मुख्य मार्गांवर वाढत्या वाहतुकीमुळे सतत कोंडी होत आहे. त्यामुळे नागरिक, व्यापारी, विद्यार्थी तसेच शेतकरी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच शहरातून जड वाहनांची मोठ्या प्रमाणात ये–जा होत असल्याने अपघातांची शक्यता वाढत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

हदगाव व परिसरातील सातपेक्षा अधिक गावांतील शेतकऱ्यांना आपली शेतीमाल वेळेत बाजारात पोहोचविणे कठीण जात असून, त्यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर हदगाव शहरासाठी रिंगरोड उभारणे हा या समस्येवर कायमस्वरूपी उपाय ठरू शकतो, असेही खा. आष्टीकर यांनी म्हटले आहे.

या निवेदनाद्वारे रिंगरोड बांधकामाचा प्रस्ताव तातडीने तयार करून संबंधित विभागामार्फत सर्वेक्षण व व्यवहार्यता अहवाल तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच राज्य सरकारच्या समन्वयातून या प्रकल्पास त्वरित मंजुरी देऊन प्राधान्याच्या आधारावर काम सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. हदगाव शहराच्या वाहतूक सुलभतेसह जनसुरक्षा व प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने हा रिंगरोड प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याचे म्हटले आहे.

# पेनूर जि. प. शाळेत महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यातील पेनूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक बसूअप्पा धोंडे यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिनतात्या धोंडे, माधव पाटील गवते, विलासअप्पा कंधारकर, शिवहार गोवखंडे, राजूअप्पा आराळे, दीपक धोंडे, बबलू आराळे, मन्मथ धोंडे, संग्रामअप्पा सुकणे, राजूअप्पा कंधारकर, नागनाथ आराळे व प्रमुख व्याख्याते म्हणून सहशिक्षक रामलिंग नागठाणे यांची उपस्थिती होती.

समता, बंधुभाव आणि समाजसुधारणेचा संदेश देणाऱ्या महात्मा बसवेश्वर यांचे विचार आजही समाजहितासाठी उपयुक्त आहेत, असे विचार सामाजिक कार्यकर्ते विरभद्र फाजगे यांनी व्यक्त केले.

यावेळी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यावर प्रकाश टाकला तर प्रमुख व्याख्याते रामलिंग नागठाणे यांनी सखोल असे मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक प्रलोभ कुलकर्णी यांनीही आपल्या मनोगतातून महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

यावेळी हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रलोभ कुलकर्णी, सहशिक्षक गंगाराम राऊत, रामलिंग नागठाणे, शिवाजी मोरे, माधव पवार, अनुप कंदुलवार यांच्यासह मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी, गावकरी, पालक व शालेय समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गंगाराम राऊत यांनी केले तर आभार माधव पवार यांनी मानले.

# स्मार्ट कार्ड नसले तरी सवलत सुरूच, महिलांसह सर्व पात्रांना लाभ –सहायक आगारप्रमुख अनिल पळनाटे



**लोहा (प्रतिनिधी)** –कंधार राज्य परिवहन महामंडळाच्या सवलतीच्या प्रवास योजनेअंतर्गत स्मार्ट कार्ड नसलेल्या पात्र लाभार्थींचाही सवलतीचा प्रवास सुरूच असल्याचे स्पष्टीकरण कंधार आगारचे सहायक वाहतूक अधीक्षक अनिल पळनाटे यांनी दिले आहे. तसेच प्रवाशांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

राज्य परिवहन महामंडळामार्फत ६५ वर्षे व ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग प्रवासी तसेच महिलांना सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा दिली जाते. महिलांसाठी अर्ध्या तिकिटदरात (५०% सवलत) प्रवासाची योजना सुरू असून, मोठ्या प्रमाणात महिला प्रवासी या योजनेचा लाभ घेत आहेत.

या योजनेअंतर्गत स्मार्ट कार्ड वितरण प्रक्रिया सध्या सुरू असून, अनेक प्रवाशांकडे अद्याप स्मार्ट कार्ड उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे स्मार्ट कार्ड नसल्यास सवलत मिळणार नाही, अशी चुकीची समजूत काही ठिकाणी पसरली आहे. याबाबत कंधार आगारचे सहायक वाहतूक अधीक्षक अनिल पळनाटे यांनी स्पष्ट केले की, ज्यांच्याकडे सध्या स्मार्ट कार्ड उपलब्ध नाही अशा पात्र लाभार्थींनाही नियमानुसार सवलतीचा लाभ दिला जात आहे आणि पुढेही दिला जाणार आहे. सवलतीची प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येत असून, पात्र प्रवाशांनी लवकरात लवकर स्मार्ट कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन कंधार आगारचे सहायक वाहतूक अधीक्षक अनिल पळनाटे यांनी केले आहे.

# सिडकोतील अहिल्यादेवी सार्वजनिक वाचनालयात महापुरूषांच्या जयंतीनिमित्त वाचक मेळावा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** – पुण्यश्लोक अहिल्या् देवी सार्वजनिक वाचनालय होळकर नगर सिडको नांदेड येथे महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त नुकताच वाचक मेळावा घेण्यात आला.

या वाचक मेळाव्याचे उद्घाटन प्रसंगी प्रबोधनकार गोविंदराम शूरनर म्हणाले, महापुरुषांचे वाचन केलात तर वाचाल. ग्रंथ हेच माणसाचे खरे गुरू आहेत, ते नेहमी जीवन जगण्याचा मार्ग दाखवतात. ज्यांनी ज्यांनी वाचन संस्कृती जोपासली ते ते महापुरुष म्हणून पुढे आले. सर्व महापुरुष वाचन संस्कृतीमुळेच घडले आणि संदेश देवून गेले. महापुरुषांच्या कार्यांची पावती म्हणून आज त्यांची जयंती साजरी होत आहे. त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवू वाचन संस्कृतीचा धागा बनावे, असे आवाहन प्रबोधनकार गोविंदराम शूरनर यांनी केले.

प्रमुख वक्ते डॉ. शंकर स्वामी मार्गदर्शन करताना म्हणाले, इतिहास वाचल्याशिवाय इतिहास घडवता येत नाही. प्रत्येकाने आपापल्या घरात पुस्तकांचा कोपरा तयार करावा. पुढे म्हणाले, पुरुषांनी आपल्यातला खोटा अहंकार बाजूला ठेवून महिलांचा आदर करायला शिका, तर महापुरुषांची जयंती खऱ्या अर्थाने साजरी होईल.

अध्यक्षीय भाषणात भूसंपादन अधिकारी केरबा जेटेवाड म्हणाले, प्रबोधनकार गोविंदराम शूरनर यांनी अहिल्यादेवी वाचनालय या ज्ञान मंदिरात दर महिन्याला महापुरुषांच्या जयंतीनिमित्त समाज प्रबोधनाचा कार्यक्रम ठेवून समाज घडविण्याचे उत्कष्ट कार्य करतात. त्याचा लाभ समाजाने घ्यावा, तसेच आपण व आपले पाल्य वाचनालयाचे वाचक बनून वाचन संस्कृती वाढवावी असे आवाहन केले. प्रमुख पाहुणे सतिशचंद्र शिंदे यावेळी म्हणाले, भारत सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचे न टाळता ती करावी व लोकशाहीत उपेक्षित समाजाला न्याय मिळवून द्यावा व महापुरुषांचे स्वप्न पूर्ण करावे. यावेळी सर्वप्रथम महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी सुभाष पाटील, गजानन जामकर, मधुकर भोसीकर, पंढरीनाथ खोंडे, जनार्धन कांबळे, अभियंता मदनेश्रर शूरनर सूर्यकांत गुंडाळे, गणेश राठोड, अशोक खटके, साईप्रसाद देवकाते, सुमनताई जिरोनेकर, गौरी देवकाते, मृणाली शूरनर, सविता हेळगीरे, शुभांगी कांबळे, सावित्रीबाई शूरनर यांची उपस्थिती होती. प्रथम प्रस्तावित राजेंद्रकुमार तुडमे व सूत्रसंचालन धोंडीबा मोरे यानी केले. शेवटी उपस्थितांचे आभार सौ. मदनेश्वरी शूरनर यांनी मानले.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**देगलूर (प्रतिनिधी)** –एका पन्नास वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवार, दि. १९ एप्रिल रोजी घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली.

शहरातील गोकुळनगर येथील मारुती मष्णाजी अक्यमवार (वय ५०) यांनी पंप हाऊस रस्त्यालगत असलेल्या लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आपले जीवन संपविल्याचे आढळून आले. सकाळी ११ ते ३ च्या सुमारास ही बाब नागरिकांच्या निदर्शनास आली. घटनेची माहिती मिळताच या भागाचे नगरसेवक प्रतिनिधी दिगंबर कडलवार, बालाजी मैलागिरे, हनुमंत कडलवार, रवी उल्लेवार यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील कार्यवाही केली.

या प्रकरणी येथील पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून अधिक तपास केला जात असल्याचे सूत्राने सांगितले आहे.

## पारडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी रूकुबाई डिकळे यांची बिनविरोध

**लोहा (प्रतिनिधी)** –तालुक्यातील पारडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सौ.रुकुबाई उध्दव डिकळे यांची बिनविरोध निवड झाली आहे.



लोहा तालुक्यातील मौजे पारडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला होता व उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख दि. १३ एप्रिल २०२६ होती. या निवडणुकीसाठी ४ महिला उमेदवारांनी नामांकन पत्र दाखल केले होते. सरपंच पद हे सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव होते. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी प्रयागबाई माणिकराव डिकळे, निलुबाई भिवाजी हंकारे, संगिता (संघमित्रा) गायकवाड यांनी नामांकन पत्र मागे घेतले. त्यामुळे रूकुबाई उध्दव डिकळे यांचा एकमेव पारडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी उमेदवारी अर्ज राहिला. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

# इतर मागासवर्गीय समाजातील गरजू व्यक्तींना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज योजना

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांच्या १४ उपकंपन्या या महामंडळामार्फत इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण कल्याणाकरिता बेरोजगारांसाठी स्वयंम उद्योगासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. इतर मागासवर्गीय प्रवार्गातील गरजू व कुशल व्यावसायिक व्यक्तींना कृषी संलग्न व पारंपरिक उपक्रम व लघु उद्योग व मध्यम उद्योग उत्पादन, व्यापार विक्री सेवाक्षेत्र इत्यादी व्यवसायासाठी या महामंडळाच्या योजना आहेत. सदरील सर्व योजनेकरिता महामंडळाच्या वेबपोर्टल संगणक प्रणालीवर नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे.

या योजनेमध्ये अर्जदाराचा सिबील क्रेडिट स्कोअर किमान ५०० पेक्षा जास्त असावा, अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू. १ लक्षपेक्षा कमी असावे, परतफेडीचा कालावधी ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये राहील, नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना या योजनेत व्याज अदा करावे लागणार नाही परंतु थकित झालेल्या हप्त्यांवर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकरण्यात येईल.

या योजनेमध्ये ७५ टक्के रक्कम ही बँकेची असून त्यावरील व्याज हे बँकेच्या नियमाप्रमाणे राहील २०% रक्कम ही महामंडळची असून त्यावर द.सा.द.शे. ६ टक्के व्याज आकारण्यात येते व ५ टक्के सहभाग हा लाभार्थ्याचा आहे. या योजनेची कर्ज मर्यादा रुपये ५ लाखांपर्यंत असून परतफेडीचा कालावधी पाच वर्षाचा समान ६० हप्त्याचा आहे.

सदर योजना बँकेमार्फत राबविण्यात येत असून, कर्ज मर्यादा १५ लक्षपर्यंतची आहे. या योजनेत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लक्षपर्यंत आहे. कर्ज परतफेडीचा कालावधी बँकेच्या निकषाप्रमाणे तसेच कर्ज रक्कमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याजाची रक्कम (१२% च्या मर्यादित) व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरूपात बँक प्रमाणिकरणानुसार लाभार्थ्याच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल तसेच लाभार्थ्याने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरू असल्याचे किमान दोन फोटो अपलोड करणे अनिवार्य आहे.

# माहूर शहरात चिडीमार पथकाची स्थापन करण्याची मागणी

**माहूर (प्रतिनिधी)** – माहूर शहरात चिडीमार पथकाची स्थापना करण्याची मागणी शिवसेना तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक व युवासेना तालुकाप्रमुख सोनू चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना माहूर शहरप्रमुख राणा ऊर्फ विजयसिंह बजरंगसिंह हजारी यांनी युवासेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह पोलीस स्टेशन माहूर येथे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली असून, सहायक पोलीस निरीक्षक शरद घोडके यांनी निवेदन स्वीकारले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माहूर शहर हे तीर्थस्थळ व तालुकास्थळ असल्याने या ठिकाणी भाविकांसह, नागरिकांची सतत गर्दी होत असते. त्यातच धार्मिक स्थळे, बसस्थानक, शाळा, महाविद्यालय, कोचिंग क्लासेस, बाजारपेठ यांसह गजबजलेला परिसर असलेल्या ठिकाणी अनेकदा टवाळखोरांकडून (रोड रोमिओ) महिला व मुलींच्या छेडछाडीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. या संवेदनशील प्रकरणांपैकी अपवाद वगळता नुसती ओरड होते, पोलीस तक्रार नाही. नुकतीच अमरावती जिल्ह्यात घडलेली घटना अत्यंत गंभीर असून माहूर शहरात अशा घटना घडू नयेत यासाठी यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. अनेकदा सामाजिक बदनामीची भीती, कुटुंबाची प्रतिष्ठा, आरोपीकडून मिळणाऱ्या धमक्या, पोलीस कारवाईबद्दल अविश्वास आणि प्रक्रियेतील विलंब ही मुली व महिलांच्या छेडछाडीच्या घटनेची पोलिसात तक्रार न होण्याची मुख्य कारणे आहेत. तेव्हा पोलीस प्रशासनाने या प्रकरणी लक्ष घालावे, अशी मागणी होत असून, या निवेदनावर राणा यांच्यासह सोनू चौधरी, ओम केशवे, भावेश शेवाळे, नकुल पस्पुलवार, शिव सोनुने, सूरज लहानकर, सागर मोरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पूर्णा येथे लोको फेल्युअर समस्यांवरील ट्रबलशुटिंग तंत्रांवर सुरक्षा परिसंवाद आयोजित



**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात पूर्णा येथे अलीकडील व मागील लोको फेल्युअर समस्यांवरील ट्रबलशुटिंग तंत्र या विषयावर सुरक्षा परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादाचा उद्देश रनिंग स्टाफचे तांत्रिक ज्ञान वाढवणे तसेच ऑपरेशनल अडचणी प्रभावीपणे हाताळण्यासाठी त्यांची तयारी बळकट करणे हा होता, ज्यामुळे सुरक्षित रेल्वे संचालन सुनिश्चित होईल.

परिसंवादा दरम्यान लोकोमोटिव्ह संचालनाशी संबंधित विविध ट्रबलशूटिंग तंत्रांबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः कमी बॅटरी व्होल्टेज, MR प्रेशर कमी होणे, तसेच BP प्रेशर निर्माण व टिकवून ठेवण्याच्या विविध पद्धती यांसारख्या मुद्द्यांवर सविस्तर माहिती देण्यात आली. पुनरावृत्ती होणाऱ्या बिघाडांना आळा घालण्यासाठी आणि संचालनाची विश्वासार्हता वाढवण्यासाठी प्रत्यक्ष मार्गदर्शन व त्वरित दुरुस्ती उपाययोजनांवर भर देण्यात आला. हा परिसंवाद एस. एस. आर. फणी कुमार, विभागीय विद्युत अभियंता/TRSO यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. त्यांनी उपस्थितांना संबोधित करत लोको फेल्युअर प्रभावीपणे हाताळण्यासाठी महत्त्वपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन केले.

या परिसंवादास एकूण ४९ कर्मचारी उपस्थित होते, ज्यामध्ये मुख्य लोको निरीक्षक (CLI), लोको पायलट आणि सहायक लोको पायलट यांचा समावेश होता. या सत्रात जागरूकता वाढवणे, ट्रबलशूटिंग कौशल्य सुधारणा करणे आणि ऑपरेशनल अडचणींच्या वेळी त्वरित प्रतिसाद देण्यावर विशेष भर देण्यात आला.

# शेवडी (बा.) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– सामान्य नागरिकांचे प्रश्न स्थानिक पातळीवर सुटावेत आणि शासकीय योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने लोहा तालुक्यात चौथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर लोहा तालुक्यातील शेवडी (बा.) येथे नुकतेच संपन्न झाले. आ. आनंदराव बोंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या शिबिरात शेकडो नागरिकांनी विविध शासकीय सेवांचा प्रत्यक्ष लाभ घेतला.

शासन नागरिकांच्या दारी येऊन त्यांच्या समस्या सोडवत आहे, ही अभिनंदनीय बाब आहे. समाधान शिबिरामुळे नागरिकांचा वेळ व पैसे दोन्ही वाचला आहे, असे मत उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने परिसरातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमास आमदार आनंदराव बोंढारकर यांनी मार्गदर्शन करून शिबिरातील विविध स्टॉलला भेटी दिल्या. कामकाजाची पाहणी केली व त्यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटपही केले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या प्रेरणेने व उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, लोहाचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली शेवडी (बा.) येथे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये महसूल, कृषी, आरोग्य, पंचायत समिती, भूमी अभिलेख, जि. प. बांधकाम विभाग, दुय्यम निबंधक, पशुधन विकास तसेच शिक्षण विभाग अशा विविध विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या आपापल्या विभागातील विविध योजनांची सविस्तर माहिती देत लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारले.

तहसील कार्यालय लोहाच्या वतीने शिबिरात महसुली सेवांचे वितरण करण्यात आले. यामध्ये ऑनलाईन सातबारा उतारे व आठ–अ उतारे, फेरफार उतारे नागरिकांना देण्यात आले. तसेच २० पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. याशिवाय ७/१२ व फेरफार, १६ नवीन शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. तसेच शिधापत्रिका दुरुस्त्या संदर्भातील ३० अर्जही स्वीकारण्यात आले. शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र असे एकूण १३ प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या अभियानांतर्गत जिवंत ७/१२ मोहिमेंतर्गत अद्ययावत अभिलेख उपलब्ध करून देण्यात आले, ८–अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या.

तहसीलदार परळीकर यांनी प्रास्ताविकात अभियानाची रूपरेषा स्पष्ट केली. उपस्थितांचे आभार ग्रा. म. अधिकारी निळकंठ पांडागळे यांनी केले. याप्रसंगी महसूल विभागाचे अधिकारी, विविध विभागांचे कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

शेवडी (बा.) चे मंडळ अधिकारी के. बी. रेणके, ग्राम महसूल अधिकारी उमाकांत भांगे, मोतीराम पवार, मुर्गेश नाडार, सचिन नरवाडे, निळकंठ पांडागळे, नेताजी रायाजी, कैलास बोधगिरे, निखील सुंदरगिरवार, महसूल अधिकारी संघटनेचे अध्यक्ष भुवनेश्वर विभुते तसेच कृषी सहायक, ग्रामसेवक, महसूल सेवक यांनी उपस्थित राहून या अभियानास सहकार्य केले. नायब तहसीलदार राजेश पाठक, संदीप हाडगे, पुरवठा निरीक्षण अधिकारी नागार्जुन खैरे, तसेच सर्व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती...

# शिवार

# हरितगृहातील गुलाबावरील फुलकिड्यांचे व्यवस्थापन

**अलीकडे गुलाबावरील विविध किडींपैकी फुलकिडे (थ्रीप्स) ही महत्त्वाची कीड ठरू लागली आहे. या रसशोषक किडीमुळे फुलांचे उत्पादन आणि दर्जावर विपरीत परिणाम होतो. पारंपरिक गुलाब शेतीसोबत हरितगृहातील संरक्षित शेतीमध्येही त्यांचा धोका वाढला आहे. ही कीड वनस्पतींच्या कोवळी पाने, फुलांच्या कळ्या, दांडे यांचे गंभीर नुकसान करते. परिणामी, जगभरातील फूल उत्पादकांना मोठा फटका बसतो.**



## फ्लॉवर थ्रीप्स

- शास्त्रीय नाव : फ्रँक्लिनिएला ऑक्सीडेंटलिस (पेरगांडे)
- हंगामानुसार फुलकिडीचा प्रादुर्भाव : फुलकिडींचा प्रादुर्भाव वर्षभर आढळतो. फुलकिडे वर्षभर नवीन कोवळ्या पानांचे व फुलांचे नुकसान करीत असतात. फुलकिड्यांची सर्वाधिक संख्या नोव्हेंबर-डिसेंबर आणि एप्रिल -मे महिन्यात आढळते. तापमान आणि आर्द्रतेचा परिणाम फुलकिडींच्या संख्येवर होतो. या महिन्यात कमाल तापमान ३० ते ३३ अंश सेल्सिअस, किमान तापमान १० ते १५ अंश सेल्सिअस तापमान आणि ६० ते ७० टक्के आर्द्रता असते. अशा कालावधीत फुलकिड्यांचे प्रमाण वाढते.



- वर्णन आणि जीवन चक्र : फुलकिड्याचे प्रौढ सामान्यतः एक ते दोन मि.मी. लांब असून, आकाराने लहान असतात. अंडी ते प्रौढ जीवन अवस्था पूर्ण होण्यासाठी दोन ते



तीन आठवडे लागतात. तथापि, अंड्यापासून प्रौढ होईपर्यंतचा काळ तापमानावर अवलंबून असतो. तापमान २६ ते २९ अंश सेल्सिअस (७९ आणि ८४ अंश फॅरनहिट) दरम्यान असताना जीवनचक्र सात ते १३ दिवसांत पूर्ण होऊ शकते. मादी ४५ दिवस जगते. आयुष्यकाळामध्ये १५० ते ३०० अंडी घालते.

- अंडी अवस्था : अंडी दोन ते साडेचार दिवसांत उबतात.
- अळी अवस्था : यात दोन टप्पे असतात.
- पहिली अळी अवस्था : लहान आणि पांढरी असते. एक-दोन दिवसांत मोठी होते.
- दुसरी अळी अवस्था : ही अळी कोवळी पाने व फुलांचे रस शोषून घेतात. ते विकसित होत असलेल्या पर्णसंभाराखाली किंवा फुलांच्या पाकळ्या जोडणीच्या ठिकाणी आढळतात.
- कोष अवस्था : कोषावस्थेमध्येही विकासाचे दोन टप्पे असतात.
- पहिला टप्पा : पूर्व कोषावस्था (प्रीप्युपा अवस्था)
- दुसरा टप्पा : कोषावस्था (प्युपा अवस्था)
- काही प्रजाती मातीत सुप्त अवस्थेत जातात, तर काही प्रजाती पानांवरच सुप्त अवस्थेत जातात. पूर्व कोषावस्थेचा कालावधी ८-१० दिवसांचा असतो आणि सुप्त कालावधी २-४ दिवस असतो. पाक जीवन चक्र सुमारे १२ ते २० दिवसांत पूर्ण होते.
- प्रौढ अवस्था : साधारण सहा दिवसांनी सुप्त अवस्थेतून प्रौढ थ्रीप्स बाहेर पडतो. प्रौढांना पंख असले तरी ते नीट उडता येत नाही. हरितगृहातील पंखे आणि बाह्य वायुझोतांबरोबर संपूर्ण हरितगृहामध्ये पसरतात. प्रौढ फुलकिडे काही विशिष्ट रंग (पिवळा, निळा आणि पांढरा) आणि वनस्पतींच्या हालचालींकडे आकर्षित होतात.

## नुकसानीचा प्रकार...

अप्सरा आणि प्रौढ या दोन्ही हानीकारक अवस्था आहेत. कोवळी पाने आणि फुलांच्या पृष्ठभागावर इजा करून त्यातील स्त्रवणारा रस शोषतात. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये कोवळ्या पानांवर व फुलांवर लाल, तपकिरी डाग किंवा रेषा दिसतात. पुढे प्रभावित कोवळी पाने वरच्या दिशेने वळतात. जुनी झाल्यावर वेडीवाकडी होतात. फुलकळीच्या सुरुवातीच्या अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास कळ्यावर डाग पडतात. विशेषतः बाह्य सेपल्स पाकळ्या विकृत होतात. कळ्या अर्धवट उघडतात किंवा वेळेपूर्वी बंद होतात. फुलांच्या पाकळ्यांवर चांदीसारख्या पांढऱ्या किंवा तपकिरी रेषा पडून फुले खराब होतात. प्रभावित फुलांच्या पाकळ्या उलगडून पाहिल्यास फुलकिड्यांच्या विविध अवस्था मोठ्या संख्येने दिसतात.

## सर्वेक्षण अन् निरीक्षण

- थ्रीप्सचा प्रादुर्भाव वेळीच लक्षात येण्यासाठी आणि व्यवस्थापनासाठी नियमित सर्वेक्षण केले पाहिजे. त्यासाठी हरितगृहामध्ये झाडाजवळ प्रति १००० वर्गमीटरमध्ये १०-१५ पिवळे/ निळे चिकट सापळे लावावेत.
- प्रति चिकट सापळा पाचपेक्षा अधिक फूलकिडे आठवड्याला आढळल्यास फवारणीचे नियोजन करावे.
- आठवड्यातून १-२ वेळा प्रत्यक्ष पाहणीही करत राहावी. त्यासाठी फुले स्वच्छ पांढऱ्या कागदावर हलक्या हाताने झटकावी. कागदावर ते स्पष्ट दिसून येतात.
- फुले असलेल्या गुलाब झाडांकडे थ्रीप्स लवकर आकर्षित होतात. उमललेली फुले वेळीच पिंच करून घ्यावी.(उदा. उमललेली पिवळी व पांढरी फुले)

## मशागतीय नियंत्रण

रोपे आणून लावण्यापूर्वी हरितगृह व आजूबाजूच्या परिसरातील तणे काढून घेतल्याची खात्री करावी. पुढे नियमित अंतराने तणनियंत्रण करून साफसफाई करावी. थ्रीप्सच्या प्रादुर्भावाचे स्त्रोत नष्ट करण्यासाठी हरितगृहात स्वच्छता राखावी.



## यामुळे वाढतो फुलकिडीचा प्रादुर्भाव

- ज्या वनस्पतीमध्ये कर्बोदके, प्रथिने, स्टेरॉल्स आणि जीवनसत्त्वे अशा पोषक तत्त्वे अधिक असतात. त्यावर फुलकिडीच्या वाढीचा दर अधिक असतो. नवीन फुलकिड्यामुळे पुनरुत्पादन क्षमता वाढते.
- वनस्पतीमध्ये अमिनो ॲसिड आणि प्रथिने मुबलक असल्यासही फुलकिडे वाढीस पोषक वातावरण तयार होते. अशा झाडावर फुलकिडीची मादी अधिक अंडी घालते.
- वनस्पतीमध्ये नत्राचे प्रमाण अधिक असल्यास त्यावर फुलकिडींचा अधिक हल्ला होतो.
- मादी सामान्यतः पानांच्या पृष्ठभागाच्या खाली किंवा फुलांच्या पाकळ्यांमध्ये आतील भागात अंडी घालते. स्पर्शजन्य कीटकनाशकांची फवारणी पोहोचू शकत नाही. यामुळे फुलकिडींची संख्या वाढते.

## जैविक नियंत्रण

जैविक नियंत्रणासाठी भक्षक फायटोसाइड माइट्स, ॲम्बलिसीयस कुकुमेरिस आणि ए. स्विस्क हे कोळी १ ते ५ प्रति रोप प्रमाणात उपयोगी ठरतात. लेकॅनिसिलियम लेकॅनी किंवा बिव्हेरिया बॅसियाना या जैविक कीडनाशकाची ५ मि.लि. किंवा ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. विशेषतः २० ते २५ अंश सेल्सिअस तापमान आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त सापेक्ष आर्द्रता अशा थंड आणि दमट हवामानात जैविक कीडनाशकाच्या फवारणीची कार्यक्षमता वाढते. किडींचे प्रमाण आटोक्यात ठेवण्यासाठी वनस्पतिजन्य कीडनाशके उपयोगी ठरतात. उदा. निंबोळी फॉर्म्यूलेशन तीव्रतेनुसार, १ टक्का प्रमाणात २.५ मिलि आणि ५ टक्के प्रमाणात ०.५ मिलि प्रति लिटर पाणी. एकरी ६०० ते ८०० लिटर द्रावण वापरावे.

## रासायनिक नियंत्रण

किडीच्या निरीक्षणातून प्रमाण कमी असताना नियंत्रण करण्यासाठी प्रयत्न करावेत. थ्रीप्सचे एका फवारणीद्वारे संपूर्ण नियंत्रण होत नाही. थ्रीप्स आटोक्यात येईपर्यंत पाच दिवसांच्या अंतराने किमान दोन वेळा फवारणी करावी. थ्रीप्स आटोक्यात आल्यानंतर सात ते दहा दिवसांच्या अंतराने पुढील फवारणी करावी. फुलकिड्यांमध्ये कीटकनाशकांप्रति प्रतिकारकता विकसित होऊ नये, यासाठी एकदा वापरलेले कीटकनाशक पुढील किमान चार आठवड्यांपर्यंत वापरू नये. कीटकनाशकांचा आलटून- पालटून वापर करणे फायदेशीर ठरते. फवारणीची कार्यक्षमता जोखण्यासाठी चिकटसापळ्याचे दर आठवड्याला निरीक्षण करत राहावे. त्यात चिकटणाऱ्या फुलकिड्यांची संख्या कमी होत असल्यास आपली फवारणी उपयोगी ठरली, हे लक्षात येते.

## खत व्यवस्थापन

- प्रतिचौरस मीटर क्षेत्रासाठी शेणखत १० किलो या प्रमाणात वापरावे. लागवडीनंतर ३ आठवड्यांनी नत्र ३० ग्रॅम, स्फुरद ३० ग्रॅम व पालाश २० ग्रॅम या प्रमाणात विद्राव्य खतातून ठिबकसंचातून सोडावे. एक महिन्यानंतर पुढील ४ महिने पुढीलप्रमाणे विद्राव्य खते द्यावीत.
- एकात्मिक खत व्यवस्थापन : लागवडीनंतर दरवर्षी प्रतिचौरस मीटर क्षेत्रासाठी शेणखत २ किलो अधिक निंबोळी पेंड २०० ग्रॅम याप्रमाणात द्यावे. तसेच गांडूळ खत ५०० ग्रॅम/ चौ.मी. या प्रमाणात वर्षातून दोन वेळा द्यावे.
- जैविक खते ॲझोस्पिरिलियम अधिक पी.एस.बी. प्रत्येकी २ ग्रॅम/ झाड याप्रमाणात दर दोन महिन्यांनी द्यावे. गांडूळखत ५०० ग्रॅम/ चौ.मी. क्षेत्रास वर्षातून दोन वेळा द्यावे.

| महिना | नत्र (मिलिग्रॅम प्रतिझाड प्रतिआठवडा) | स्फुरद (मिलिग्रॅम प्रतिझाड प्रतिआठवडा) | पालाश (मिलिग्रॅम प्रतिझाड प्रतिआठवडा) |
|---|---|---|---|
| पहिला | १०० | १०० | १०० |
| दुसरा | २०० | २०० | २०० |
| तिसरा | ३०० | २०० | २०० |
| चौथा | ४०० | ३०० | ३०० |

# फायद्यात वाढ देणारे पनीर उत्पादन



**पनीर हा आहारामध्ये मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा दुग्धजन्य पदार्थ आहे. त्याची मागणी सातत्याने वाढत असून, दूध उत्पादक शेतकऱ्यांनी पनीर उत्पादनाचे तंत्र शिकून घेतल्यास फायद्यामध्ये वाढ होऊ शकते.**

दुधापासून पनीर, खवा, चीज, तूप अशा विविध मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादनाची निर्मिती करणे अत्यंत आवश्यक आहे. पनीर हे सामान्य दुधापेक्षा जास्त काळ टिकून राहते. शाकाहारी व्यक्तींसाठी प्रथिनांचा उत्तम स्त्रोत मानल्या जाणाऱ्या पनीरमध्ये आरोग्यवर्धक केसीन ही प्रथिने असतात. दुग्धजन्य पदार्थांपेक्षा पनीरमध्ये अधिक पोषण मूल्य असते. पनीर निर्मितीसाठी स्निग्धांशाचे प्रमाण अधिक असल्याने म्हशीचे दूध उत्तम असते. गरम दुधात आम्ल टाकून दूध फाटल्यानंतर त्यातील पाण्याचा अंश काढून टाकला जातो. उर्वरित घनपदार्थाला पनीर असे म्हणतात. दूध फोडण्यासाठी साधारणपणे लॅक्टिक किंवा सायट्रिक आम्लाचा वापर केला जातो. म्हशीच्या एक लिटर दुधापासून २०० ते २५० ग्रॅम, तर गाईच्या एक लिटर दुधापासून १५० ते २०० ग्रॅम पनीर मिळते. पनीर निर्मितीसाठी विविध यंत्रे बाजारात उपलब्ध आहेत. मात्र, महागड्या यंत्रांशिवायही घरगुती पद्धतीने पनीर निर्मिती करता येते.

### पनीरमधील पोषण मूल्ये (प्रति 100 ग्रॅम)

ऊर्जा - २९६ किलो कॅलरी, प्रथिने - १९.१ ग्रॅम, दुग्ध शर्करा – २.५ ग्रॅम, स्निग्धांश - २७.१ ग्रॅम, खनिजे - १.९ ग्रॅम, कॅल्शिअम - ४२० मिलीग्रॅम, सोडियम – २२.१ मिलीग्रॅम, लोह - २.१६ मिलीग्रॅम, आर्द्रता - ५२.३ ग्रॅम.

### साहित्य अन् उपकरणे...

दूध, सायट्रिक आम्ल किंवा व्हिनेगार किंवा लॅक्टिक आम्ल, मलमल कापड, स्टीलची कढई, पळी, शेगडी, पनीर दाब यंत्र व पॅकेजिंग साहित्य.

## समजून घ्या पनीर प्रक्रिया



पनीर बनविण्यासाठी प्रथम दूध तापवून घ्यावे लागते. त्यासाठी सामान्यपणे स्टेनलेस स्टिलच्या स्वच्छ कढई, पातेले यांचा वापर करावा किंवा खवा बनवण्याचे यंत्रही यासाठी वापरता येते. स्टीलच्या भांड्यामध्ये दूध ८२ अंश सेल्सिअस तापमानाला ५ ते १० मिनिटांसाठी गरम करून घ्यावे. दूध उकळत असताना तळाशी लागू नये म्हणून ढवळत राहावे. त्यानंतर दुधाचे तापमान ३५ ते ४० अंशापर्यंत कमी होऊ द्यावे. त्यानंतर त्यात प्रति लिटर दुधामध्ये २ टक्के सायट्रिक आम्ल किंवा व्हिनेगारचे द्रावण हळूहळू ढवळत ओतावे. दूध फाटून घनपदार्थ एकत्र आल्यानंतर सायट्रिक आम्लाचे द्रावण टाकणे बंद करणे. आम्लामुळे दुधापासून छन्ना वरच्या बाजूला व दूधविरहित पाणी, निवळी खालच्या बाजूला राहते. मिश्रण ५ ते १० मिनिटे स्थिर ठेवावे. नंतर छन्ना मखमली कपड्यातून गाळून घेत पाणी काढून टाकावे. नंतर तो पदार्थ पनीर तयार करण्याच्या पात्रात २० ते ३० मिनिटांपर्यंत ठेऊन त्यावर दाब द्यावा. त्यानंतर तयार झालेले पनीर बाहेर काढून पोत चांगला होण्यासाठी त्यास २ अंश सेल्सिअस तापमान असलेल्या थंड पाण्यात तीन ते चार तासापर्यंत ठेवावे. (हे पाणी अगोदर उकळून चांगले थंड केलेले असावे). नंतर थंड झालेले पनीरला शीतकक्षात साठवून ठेवावे.

## पनीर टिकविण्यासाठी घ्यावयाची काळजी

सामान्य तापमानाला पनीर जास्तीत जास्त एक दिवस टिकू शकते. पनीर उत्तमरीत्या टिकविण्यासाठी सॉरबिक ॲसिड या परिरक्षकाचा (प्रीझर्व्हेटिव्ह) वापर करता येतो. सॉरबिक ॲसिड २० ते ३० अंश सेल्सिअस तापमान असलेल्या कोमट पाण्यात विरघळवून थेट दुधात वापरतात किंवा सॉरबिक ॲसिडच्या द्रावणातून पनीर बुडवून ठेवले जाते. त्यानंतर पनीरचे पॅकेजिंग केले जाते. कुठलेही प्रिझर्व्हेटिव्ह न टाकलेले पनीर २ अंश सेल्सिअस तापमानाला ॲल्युमिनिअम फॉईलमध्ये पॅक करावे. साधारणपणे ५ ते ७ दिवस टिकते. सॉरबिक ॲसिड (दुधाच्या ०.१ टक्के) वापरल्यामुळे व पीव्हीसी (पॉलीव्हिनायल क्लोराईड) फिल्ममध्ये घट्ट पॅक करावे. असे पनीर २ अंश सेल्सिअस तापमानास (रेफ्रिजरेशन तापमानाला) १ महिना टिकू शकते. पनीर ५ टक्के मिठाच्या द्रावणात बुडवून ठेवल्यास ४ ते ६ अंश सेल्सिअस तापमानाला साधारणपणे १५ ते २० दिवस टिकते. पनीरचे तुकडे करून ते टीन कॅनमध्ये पॅक करावेत. हे हवाबंद टिन कॅन १५ मिनिटांसाठी ऑटोक्लेव्ह केल्यास (प्रेशर कुकरसारखे), तर २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमानास हे पनीर ५० ते ६० दिवसांपर्यंत टिकते. फक्त या प्रक्रियेमध्ये पनीरला थोडा तपकिरी रंग येतो. श्रिंक फिल्ममध्ये पॅक केलेले पनीर २ अंश सेल्सिअस (रेफ्रिजरेटर तापमानाला) १० ते १५ दिवसांपर्यंत टिकते. पनीर इव्हीए (इथिलीन-विनाइल एसीटेट), पीव्हीडीसी (पॉलीव्हिनाल्डिन क्लोराईड), एमएपी (सुधारित वातावरण पॅकेजिंग) अशा प्रकारच्या विशिष्ट फिल्ममध्ये पॅक करावे. ते पनीर २ अंश सेल्सिअस (रेफ्रिजरेशन तापमानाला) ८० ते ९० दिवसांपर्यंत टिकवता येते.



# गांडूळ खत निर्मिती

**गांडूळ खत उपलब्ध सेंद्रिय खतांपैकी एक उत्कृष्ट खत मानले जाते. गांडूळ खत निर्मितीचे तंत्र सोपे असून, महिला सहजरीत्या हे तंत्रज्ञान आत्मसात करून शेतावर गांडूळ खताची निर्मिती करू शकतात.**



गांडूळ खत तयार करण्यासाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. गांडुळांचे कडक उन्हापासून संरक्षण होण्यासाठी बिछान्यावर छप्पर घालावे. छप्पर सिमेंटच्या पत्र्याचे किंवा शेतीमध्ये उपलब्ध असलेल्या तुराट्या, ज्वारीचे ताटे, गवत, पाचट इत्यादी किंवा बांबू वापरून करता येईल. छप्पर दोन्ही बाजूंना उताराचे असावे. जेणेकरून पावसाचे पाणी सहज निघून जाईल व दोन्ही बाजूंनी ऊन येणार नाही यासाठी छपराची मधील उंची २.५ मी. व बाजूची उंची १.५ मी. असावी. रुंदी ५ मी. व लांबी ३ मी. किंवा आवश्यकतेनुसार आणि सेंद्रिय पदार्थाच्या उपलब्धतेप्रमाणे असावी. जमिनीवर सर्वात खाली तळाला १५ सें.मी. जाडीचा सेंद्रिय पदार्थांचा (उदा. गव्हाचे काड, उसाचे पाचट, सोयाबीन-तूर, पालापाचोळा व शेतातील इतर वाया जाणारे सेंद्रिय पदार्थ इ.) थर द्यावा. त्यावर अर्धवट कुजलेले शेणखत व माती ३:१ प्रमाणात मिसळून त्याचा १५ सेमी जाडीचा थर द्यावा. (या थरामुळे उष्णता थांबवण्याचे काम करील.) पाण्यामध्ये शेण कालवून त्याचा १० सें.मी. जाडीचा तिसरा थर द्यावा. शेणामुळे सेंद्रिय पदार्थ कुजण्याची प्रक्रिया सुरू होईल व ते गांडुळांस खाद्य म्हणून उपयोगात आणता येईल. शेवटी बिछाण्यावर सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन घालावे. हे आच्छादन १५ सेमीपेक्षा जास्त जाडीचे नसावे. बिछाना पाण्याने ओला करावा.(आवश्यकतेप्रमाणे रोज किंवा दिवसाआड बिछान्यावर पाणी शिंपडावे.) बिछान्यातील उष्णता कमी झाल्यावर एक दोन आठवड्यांनी या सेंद्रिय पदार्थांचा थर बाजूला सारून कमीत कमी १००० प्रौढ गांडुळे सोडावीत. गांडूळ बिछान्यात सोडल्यावर परत सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन करावे व बिछान्यास नियमित पाणी द्यावे. गांडुळांच्या संख्येनुसार गांडूळ खत निर्मितीस दीड ते दोन महिने लागतात.

## गांडूळ खत तयार करताना घ्यावयाची काळजी

बिछान्यावर पाणी टाकताना जास्त पाणी साचणार नाही व ओलावा ४० ते ५० टक्के राहील याची काळजी घ्यावी. बिछान्यातील तापमान २० अंश ते ३० अंश सेल्सिअसदरम्यान ठेवावे व त्यावर सूर्यप्रकाश येणार नाही याची काळजी घ्यावी. गांडूळ खताच्या बेडजवळ वाळवी, बेडूक, साप, मुंग्या, गोम, उंदीर व कोंबड्या येणार नाहीत याची काळजी घ्यावी.



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# कोम्बिंग ऑपरेशन अंतर्गत ११९ गुन्हेगारांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने ६ एप्रिलपासून कोम्बिंग ऑपरेशन सुरू केले आहे. दरम्यान या ९ दिवसांत तब्बल ११९ गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे गुन्हेगारांवर वचक बसविण्याचे काम या ऑपरेशनमुळे होत आहे.

शहरातील गुन्ह्यांवर आळा बसविण्यासाठी हे ऑपरेशन सुरू आहे. या ऑपरेशनमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक भोकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, इतवारा, भोकर तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, अधिकारी व अंमलदार, शहरातील पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व दुय्यम अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग नोंदवला आहे. १९ ते २० एप्रिल दरम्यान शहरात कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. यावेळी



नाकाबंदी करण्यात आली होती. त्यात ३९ तडीपार गुन्हेगार, २३ एमपीडीएमधून सुटलेले गुन्हेगार, ५२ सराईत गुन्हेगार, अवैध शस्त्र बाळगणारे २७ गुन्हेगार, पाहिजे असलेले फरारी २१ आरोपींची तपासणी केली. या ऑपरेशनमध्ये १३१ अधिकारी व पोलीस अंमलदार बंदोबस्तामध्ये होते. एका जिल्ह्यातून हद्दपार केलेल्या मपोका कलम ५५ प्रमाणे १३, अनेक जिल्ह्यांतून हद्दपार व शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना हद्दपार केलेल्या मपोका ५६ व ५७ प्रमाणे ३० गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली.

या तपासणी दरम्यान पोलीस अधिकाऱ्यांनी सार्वजनिक सुव्यवस्था व शांतता राखण्याच्या दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या मपोका कलम १४२ प्रमाणे ८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. एमपीडीएमधील सुटलेले व सराईत गुन्हेगारांना कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान तपासणी केली असता ९८ आरोपींविरुद्ध कारवाई करून एकूण ८५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्रतिबंधात्मक व शिक्षात्मक असलेल्या मपोका कलम ११०/११७ प्रमाणे २ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. कोम्बिंग ऑपरेशनद्वारे ९ दिवसांत तब्बल ११९ पेक्षा जास्त गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्हा पोलीस दलाच्या वतीने विनाकारण रात्री फिरणाऱ्या वाहनधारकांची तपासणी मोहीम यावेळी राबविली. त्यात त्यांची कागदपत्रे तपासणी, कुठून आला व कुठे चालला याची माहिती तसेच त्याच्यासोबत काय साहित्य आहे याची तपासणी होत आहे. या मोहिमेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, ही मोहीम सुरू राहावी, अशा प्रतिक्रिया नांदेडवासीयांनी व्यक्त केल्या आहेत.

# भात लावणीच्या यांत्रिकी पद्धतीबाबत उद्या विशेष डिजिटल शेती शाळेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी) –** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पा अंतर्गत अभियान स्वरूपात राबविण्यात येणाऱ्या हवामान अनुकूल तंत्रज्ञानाबाबत कृषी विभाग व पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने माहे एप्रिल २०२६ मध्ये चार विशेष डिजिटल शेती शाळा घेण्याचे नियोजन केले होते. त्यानुसार १, ८ व १५ एप्रिल रोजी डिजिटल शेतीशाळा घेण्यात आल्या असून, चौथी विशेष डिजिटल शेतीशाळा २२ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे.

सदरील शेतीशाळेस कृषी विभागांतर्गत उप कृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, समूह सहायक, कृषीताई व कृषी सखी तसेच पशुसंवर्धन विभाग अंतर्गत पशुसंवर्धन विकास अधिकारी, पशुसंवर्धन पर्यवेक्षक व पशुसखी हे उपस्थित राहतील. तसेच प्रत्येक गावात एका मध्यवर्ती ठिकाणी शेतकरी एकत्रित उपस्थित राहतील असे नियोजित आहे. पाणी फाउंडेशनद्वारे संचलित डिजिटल शेती शाळा हे एक ऑनलाईन व्यासपीठ आहे, जिथे तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना शास्त्रोक्त आणि पीकनिहाय उत्तम पद्धतींचे मार्गदर्शन झूम आणि युट्युबच्या माध्यमातून दिले जाते.

यापूर्वी दि. १, ८ व १५ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या डिजिटल शेतीशाळेच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या सत्रात शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आता पुढील सत्र भाग ४ भात शेतीचे लागवड तंत्र : भाताची थेट पेरणी पद्धत आणि भात लावणीसाठी यांत्रिकी पद्धती बाबत दि. २२ एप्रिल २०२६ रोजी मार्गदर्शन मिळणार आहे.

तरी शेतकरी बंधू-भगिनी, शेतकरी गट आणि महिला बचत गटांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी आपल्या सहायक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधा. चला, हवामान बदलाला सामोरे जात, आपल्या शेतीला अधिक शाश्वत आणि समृद्ध बनवूया. उपरोक्त शेती शाळा नियोजित दिनांक दिवशी सायंकाळी ७.३० वाजता सुरू करण्यात येणार आहे.

तसेच सदर डिजिटल शेतीशाळा खाली दिलेल्या यु-ट्यूब चॅनेलद्वारे आपण डिजिटल शेती शाळा बघू शकता. या डिजिटल शेती शाळांमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा. तसेच प्रत्येक गावातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी विशेषत: बिलोली, देगलूर, किनवट, धर्माबाद या तालुक्यातील शेतकऱ्यांनी डिजिटल शेतीशाळेसाठी ऑनलाईन उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

# नांदेड विभागात जागतिक वारसा दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी) –** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात जागतिक वारसा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

ऐतिहासिक वारशाचे जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी तसेच वारसा संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. जागतिक थीम आपत्ती व संघर्षाच्या परिस्थितीत जिवंत वारशासाठी आपत्कालीन प्रतिसाद या अनुषंगाने विभागीय रेल्वे कार्यालय संकुल उद्यानातील स्टीम क्रेन स्थळी कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमात विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. यानिमित्ताने आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात विभागात जतन करण्यात आलेल्या भारतीय रेल्वेच्या महत्त्वपूर्ण वारसा वस्तूंचे प्रदर्शनही करण्यात आले. यात 'डीआरएम' कार्यालय परिसरात प्रदर्शित ३५ टन क्षमतेचा स्टीम क्रेन व नॅरो-गेज डिझेल लोकोमोटिव्ह, तसेच छत्रपती संभाजीनगर स्थानकावर जतन केलेले ऐतिहासिक स्टीम लोकोमोटिव्ह (१९६५) याचा समावेश आहे.

हे वारसा घटक भारतीय रेल्वेचा समृद्ध इतिहास व तांत्रिक प्रगती दर्शवतात. विशेषतः आपत्ती व संकटाच्या काळात अशा ऐतिहासिक वारशाचे संरक्षण करणे किती महत्त्वाचे आहे, यावर या कार्यक्रमात भर देण्यात आला. जेणेकरून पुढील पिढ्यांसाठी हे वारसास्थळ सुरक्षित राहतील. नांदेड विभाग रेल्वे वारसा जतन व प्रसारासाठी कटिबद्ध असून कर्मचारी व जनतेमध्ये या मौल्यवान वारशाच्या संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

# अवैध वाळूसह दोन हायवा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील मुसलमानवाडी पाटीजवळ हायवा क्र. (MH-20-EL-8400) मधून ५ ब्रास रेतीची चोरटी वाहतूक करताना शिवाजी धुमाळ आणि कपिल मोरे यांना ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणात ग्रामीण पोलीस ठाण्यात तसेच उस्माननगर, कापसी बु. शिवारात हायवा क्र. (MH-20-BE-3790) पकडून ५ ब्रास रेती जप्त केली. यात सुधाकर पवार आणि हायवा मालक शिवाजी येडे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्यांच्याकडून साठ लाख रुपये किंमतीचे दोन हायवा व वाळूचा साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस अमलदार शंकर माळगे यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात शिवाजी व्यंकटराव धुमाळ, कपिल मोरे यांच्याविरुद्ध उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अवैध वाळू उत्खननाविरोधात महसूल विभागाची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी) –** सोमवार, दि. २० एप्रिल रोजी पहाटे अवैध वाळू उत्खनन प्रकरणात महसूल प्रशासनाच्या वतीने कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करणारे तीन इंजिन व एक बोट जिलेटिनच्या सहाय्याने स्फोट करून उद्ध्वस्त करण्यात आले. जप्त व नष्ट करण्यात आलेल्या साहित्याची अंदाजे किंमत सुमारे १३ लाख रुपये असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तहसीलदार संजय वारकड यांच्या नेतृत्वात भनगी येथे करण्यात आली.



अवैध वाळू उपशामुळे नदीपात्राचे होणारे नुकसान, पर्यावरणीय हानी तसेच शासनाच्या महसुलाचे होणारे नुकसान लक्षात घेता प्रशासनाने कठोर भूमिका घेत ही धडक कारवाई केली.

या मोहिमेत नायब तहसीलदार स्वप्नील दिग्गलवार, मंडळ अधिकारी श्रीकृष्ण येलमाटे, कुणाल जगताप, अनिरुद्ध जोंधळे, शिवानंद स्वामी, सय्यद मोसीन तसेच ग्राम महसूल अधिकारी मनोज सारपे, मनोज जाधव, गजानन होळगे, रमेश गिरी, राजेश बरोडा, महेश जोशी, गोपीनाथ कल्याणकर, पोलीस कर्मचारी नागरगोजे आणि महसूल सेवक बालाजी सोनटक्के यांनी सहभाग घेतला.



**नांदेड –** महात्मा बसवेश्वर महाराज जयंतीनिमित्त कौठा येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. या प्रसंगी माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, महापौर कविता मुळे, गंगाधर बडुरे यांच्यासह अन्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस, नांदेड)

# गंगम्मा मंदाडे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–**



मूळच्या हणेगाव येथील श्रीमती गंगम्मा वैजनाथअप्पा मंदाडे (वय ९५) यांचे सोमवार, दि. २० एप्रिल रोजी पहाटे ५ वा. वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दु. ४ वा. नांदेड येथे वीरशैव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, नातू, पणतू असा परिवार आहे.

# देण्या-घेण्याच्या कारणावरून एकावर प्राणघातक हल्ला

**नांदेड (प्रतिनिधी) –** नायगाव तालुक्यातील पाटोदा येथे देण्या-घेण्याच्या कारणावरून दोघांनी एकाला जबर मारहाण केल्याची घटना १६ एप्रिल रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास जखमी बालाजी पुपलवाड यांच्या शेतात घडली.

नायगाव तालुक्यातील पाटोदा येथील राहणारा शेतकरी बालाजी विक्रम पुपलवाड (वय ५१) याने बरबडा ता. नायगाव येथील राजू माधव उलगुलवाड आणि सोन्या राजू उलगुलवाड या दोघांना ज्वारी विकली होती. त्या विकलेल्या ज्वारीचे पैसे का मागत आहेस म्हणून या दोघांनी बालाजी पुपलवाड यालाच त्याच्या शेतात गाठून लोखंडी रॉडने, कुऱ्हाडीने जबर मारहाण केली. यात त्यांना गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत बालाजी पुपलवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी दोघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक सोनकांबळे करीत आहेत.

# अवैध दारू बाळगणाऱ्या दोन जणांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी) –** कांचननगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोकळ्या जागेत चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने देशी दारू बाळगणाऱ्या प्रदीप इंगोले आणि चांदू कदम या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३,८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्याात दोघांना अटक करून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अक्षय तृतीयेनिमित्त उसाच्या रसाचे वाटप



**नांदेड (प्रतिनिधी) –** येथील सुशील बहूउद्देशीय मंडळातर्फे अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर गुरू गणेश जैन स्थानक, वजिराबाद येथे ३००० ग्लास ऊसाच्या रसाचे वाटप करण्यात आले. या सेवाकार्यात समाजातील अनेक भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून महापौर कविता मुळे तसेच नगरसेवक सुमित मुथा यांची उपस्थिती होती. सर्व पाहुण्यांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. जैन धर्मानुसार अक्षय तृतीयेला विशेष महत्त्व आहे. हा दिवस दान, तप, त्याग आणि सेवेसाठी अत्यंत शुभ मानला जातो. आदिनाथ भगवानांचे वर्षीतप याच पावन दिवशी पूर्ण झाले होते आणि त्यांचे पारणे झाले होते, त्यामुळे या दिवसाचे महत्त्व अधिकच वाढते. हीच भावना लक्षात घेऊन हा सेवा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील यांनी केले. या उपक्रम यशस्वीतेसाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले.

# ॲड. निलेश हेलोंडे यांचा नांदेड जिल्हा दौरा

**नांदेड (प्रतिनिधी) –** महाराष्ट्र राज्य कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे २१ व २२ एप्रिल रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ रोजी हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव येथून रात्री ८ वा. विश्रामगृह नांदेड येथे आगमन व मुक्काम. बुधवार २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वा. विश्रामगृह नांदेड येथून मुदखेडकडे प्रयाण. विश्रामगृह मुदखेड येथे तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, पशुधन विकास अधिकारी यांच्यासमवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा. दुपारी १ वा. तहसीलदार मुदखेड यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी) –** नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगार संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माहूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ सकाळी १० वा. पासून हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माहूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्यामध्ये नामांकित उद्योजकांच्यावतीने मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वा.पासून हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माहुर येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. रा. म. कोल्हे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे. आधिक माहितीसाठी संपर्क सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आनंदनगर रोड बाबानगर नांदेड. दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ येथे संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त संविधान वाटप; सभामंडपासाठी १० लाखांचा निधी - आ. बोंढारकर



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** भायेगाव येथील ग्रामपंचायतीच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या आमदार निधीतून दलित वस्ती येथील सभामंडपासाठी १० लक्ष रुपये निधी देण्यात आला आहे. या कामाचे आमदार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित ग्रामस्थ यांना भारतीय संविधान वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थितीत रोशनसिंघ जहागिरदार, बालाजी कोल्हे उपसरपंच, शिवानंद खोसडे पोलीस पाटील, त्रिमूक कोल्हे तंटामुक्त अध्यक्ष, रमेश कोल्हे शा. व्य. स. अध्यक्ष, प्रल्हाद कोल्हे माजी सरपंच, शिवाजी खोसडे, ग्रामपंचायत सदस्य शंकर खोसडे, गौतम भालेराव, अशोक कोचार, माजी उपसरपंच भीमराव भालेराव, शंकर कोल्हे, संभाजी खोसडे, भानुदास कोल्हे, नारायण मेकाले, दिगंबर भालेराव, सुनील भालेराव, ग्रामविकास अधिकारी वाकोरे, बालाजी पाटील भायेगांवकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com